शनिवार, २३ डिसेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - ०३ • अंक - १३१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 23 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-03 • ISSUE-131 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

## उगवतीचे रंग



छत्रपती संभाजी नगरमधे शुक्रवारी सकाळीच निसर्गाचं अलौकिक सौंदर्यपूर्ण दर्शन झालं. आकाशात विविध रंगांची मुक्त हस्ताने उधळण करीत निर्सगानं जणूकाही भावपूर्ण रांगोळीच रेखाटलेली होती. पुंडलीकनगरच्या पाण्याच्या टाकीजवळ हे घेतलेलं छायाचित्र आहे... सकाळीच मुंबईकडे झेपावणारं .. सहजतेनं दिसणारं विमान.. आणि विलोभनीय रंगसंगती आपलं मनं सुखावून जात आहे... हो ना...! छायाचित्र : सुधीर कोर्टीकर

# ईडीची १२ कोटींच्या मालमत्तेवर टाच

## कोरोना केंद्र गैरव्यवहार प्रकरण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : करोना केंद्र गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) सुजीत पाटकर व त्यांच्या भागिदारांच्या १२ कोटींच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. टाच आणण्यात आलेल्या मालमत्तेत तीन सदनिका, म्युच्युअल फंड व बँकेची खाती यांचा समावेश आहे. त्यांची एकूण किंमत १२ कोटी २० लाख रुपये आहे. याप्रकरणी ईडीने पाटकर यांना जुलै २०२३ मध्ये अटक केली होती. त्यांनी लाईफ लाईन मॅनेजमेंट सर्व्हिसेससाठी निविदा मिळवून ३१ कोटी ८४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.**




याप्रकरणी सप्टेंबर महिन्यात लाईफ लाईन हॉस्पिटल मॅनेजमेन्टचे भागिदार सुजीत पाटकरसह सहा जणांविरोधात विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. हे आरोपपत्र ७५ पानांचे असून त्यात बनावट कागदपत्र सादर करून सुमारे ३२ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. सुजीत पाटकर, डॉ. हेमंत गुप्ता, संजय शाह, राजीव साळुंखे, डॉ. किशोर बिसुरे, लाईफ लाईन हॉस्पिटल मॅनेजमेन्ट सर्विस कंपनी व डॉ. अरविंद सिंह यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. एनएससीआय वरळी व दहिसर येथे डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी पुरवण्याचे कंत्राट लाईफ लाईन हॉस्पिटल मॅनेजमेन्ट सर्विस कंपनीला मिळाले होते. त्याबाबत कंपनीने महापालिकेला सादर केलेला हजेरीपट व कागदपत्रे बनावट असल्याचे तपासात ईडीच्या निदर्शनास आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, करोना केंद्रांवर ५० ते ६० टक्के कमी वैद्यकीय कर्मचारी कार्यरत असतानाही बनावट कागदपत्रे तयार करून वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या संख्येचा आकडा फुगवण्यात आला. हा सर्व प्रकार सुजीत पाटकर यांच्या सांगण्यावरून करण्यात आल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले. कंपनीला कंत्राट मिळवून देण्यातही पाटकर यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांनी डॉ. बिसुरे व इतर महानगरपालिका अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या जेवणाच्या खर्चाबाबची कागदपत्रेही महानगरपालिकेला सादर केली. लाईफ लाईन हॉस्पिटल मॅनेजमेन्ट कंपनी स्थापन करताना पाटकरने केवळ १२ हजार ५०० रुपयांची गुंतवणूक केली होती. पण या गैरप्रकारातून मिळालेली मोठी रक्कम पाटकरच्या बँक खात्यावर जमा झाल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले होते. लाईफ लाईन हॉस्पिटल मॅनेजमेन्ट सर्विसला जम्बो करोना केंद्राच्या कंत्राटाचे ३१ कोटी ८४ लाख ७१ हजार ६३४ रुपये महापालिकेकडून मिळाले होते. ती रक्कम कोणापर्यंत पोहोचली, याबाबत ईडी तपास करीत आहे.

# साडेसात लाखांचे अफीम नांदेड रेल्वे स्थानकावर जप्त

## राजस्थानच्या दोघांना अटक; 'एटीएस'ची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील हुजूर साहेब रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक एकवर नांदेडच्या दहशतवादी विरोधी पथकाच्या टीमने गुरुवारी केलेल्या कारवाईत राजस्थानच्या दोघांना अटक केली. त्यांच्याकडून सात लाख ३२ हजार रुपयांची अफीन जप्त करण्यात आली आहे. त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे.

दहशतवाद विरोधी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून हजुर साहेब रेल्वे स्टेशन नांदेड येथून बाहेर जाणाऱ्या गेट नंबर एक जवळ, सार्वजनिक रोडवर, वजिराबाद ठाण्याच्या हद्दीत दुपारी साडेबारा वाजता दहशतवाद विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक माणिक बेद्रे यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली.

राजस्थानमधील दोन आरोपी सुरेशकुमार किशनाराम बिष्णोई (वय २९ वर्ष, रा. अरणीयाली ता. रानेवाडा जि. जालोर), कु.अमरी नारायण अड (वय २६ वर्ष रा.बस्सी ता. कुशलगड, जि. बांसवाडा राजस्थान) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून अंमली पदार्थ अफू (अफीम) ३.६६० किलोग्रॅम किंमती ७ लाख ३२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक बाबासाहेब पाराजी थोरे यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक माणिक बेद्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील नाईक व त्यांच्या पथकाने केली.

# जिल्हा बँक घोटाळा; माजी मंत्री सुनील केदार यांना कारावास

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** काँग्रेसचे नागपूर जिल्ह्यातील दिग्गज नेते तथा माजी मंत्री सुनील केदार यांना नागपूर जिल्हा सहकारी बँक घोटाळा प्रकरणात न्यायालयाने दोषी ठरविले आहे. न्यायालयाने सुनील केदार यांना ५ वर्षांचा कठोर कारावास आणि १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. सुनील केदार हे या प्रकरणात मुख्य आरोपी आहेत. २००१-०२ दरम्यान हा घोटाळा झाला तेव्हा केदार बँकेच्या अध्यक्षस्थानी होते. मुंबई, कोलकाता आणि अहमदाबाद येथील काही कंपन्यांनी बँकेच्या रकमेतून १२५ कोटी रुपयांचे सरकारी रोखे खरेदी केले होते. त्यानंतर या कंपन्यांनी सरकारी रोखे दिले नाही तसेच बँकेची रक्कमही परत केली नाही.दोषी ठरवलेल्या आरोपींमध्ये सुनील केदार,अशोक चौधरी, केतन शेठ, अमित वर्मा, सुबोध भंडारी, नंदकिशोर त्रिवेदी यांचा समावेश आहे. इतर दोन आरोपींपैकी रोखे दलाल संजय हरिराम अग्रवाल यांच्याविरुद्धच्या खटल्यावर मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे तर कानन वसंत मेवावाला फरार आहे.

# नाताळ व नववर्षानिमित्त तळीरामांसाठी सरकार धावले

## मद्यप्रेमींची पहाटही राहणार धुंदीत

आधुनिक केसरी न्यूज


**सचिन कोरडे**

**धाराशिव :** राज्य सरकारने मद्यप्रेमींना मोठी आनंदाची बातमी दिली आहे. नाताळ आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर दारूची दुकाने, बार पहाटेपर्यंत सुरू ठेवण्यास राज्य गृह विभागाने परवानगी दिली आहे. त्यामुळे मद्यप्रेमींना नाताळ आणि नवीन वर्षाचे स्वागत जल्लोषात करता येणार आहे. नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने 24 ,25 आणि 31 डिसेंबर रोजी मद्य विक्रीची दुकाने, परमिट रुम पहाटे पाच वाजेपर्यंत खुली ठेवण्यास परवानगी दिली आहे. त्याशिवाय, काही ठिकाणी वाईन शॉप, परदेशी आणि उंची मद्य विक्री करणारी दुकाने ही रात्री 1 वाजेपर्यंत खुली असणार आहेत. त्याशिवाय, पब, बार अ‍ॅण्ड रेस्टोरंट्स, बीअर बारदेखील पहाटे पाच वाजेपर्यंत चालु असणार आहेत.



मद्याच्या विक्रीमुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाला आर्थिक फायदा होतो. मद्य विक्रीमुळे राज्याला महसूलही मोठ्या प्रमाणावर मिळतो. त्यामुळे या वेळ वाढवून देण्याच्या निर्णयामुळे सरकारला आर्थिक फायदा होणार आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

एकदा शरीर नष्ट झाले की संपले सगळे. खरं तर भौतिक गोष्टींचा मोह धरणे ही चांगली गोष्ट नाही. अध्यात्मात तर हे सगळं नश्वर म्हणजे नष्ट होणारं आहे. ब्रह्म सत्य, जग मिथ्या. वगैरे आमच्या कानावर पडत होतं. पण ते पटायला पाहिजे ना ! त्यामुळे त्याच्या बरोबर विरुद्ध सांगणारा चार्वाक आम्हाला जवळचा वाटू लागला. पुढे विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी यासारख्या काही लोकांनी बँकांकडून कर्जे घेऊन चार्वाकांचा उपदेश अमलात आणला.
पण पुढे काळाच्या ओघात अस्मादिकांचे जसजसे शिक्षण वगैरे होत गेले, तसतसे मनावर संस्कार की काय म्हणतात ते झाले असावेत आणि चार्वाक, चरैवती चरैवती वगैरे आम्ही साफ विसरलो. खायचं ते जगण्यासाठी. खाण्यासाठी जगायचं नाही वगैरे गोष्टी लक्षात आल्या. जीवनाचं ध्येय महत्वाचं वगैरे वगैरे यासारख्या मोठमोठ्या शब्दांचा पगडा मनावर बसला. आणि पुढे दोन तीन दीक्षितांनी आमच्या मनावर प्रभाव टाकला. त्यापैकी एक माधुरी दीक्षित होती. पण तिचे केवळ चित्रपट पाहण्यातच आम्ही धन्यता मानली. पुढे जे दोन दीक्षित आले त्यात एक होते स्वदेशीचा पुरस्कार करणारे राजीव दीक्षित आणि दुसरे जगन्नाथ दीक्षित. या मंडळींनी तर आरोग्यासंबंधी अशा काही गंभीर गोष्टी सांगितल्या की आम्ही आहारावर नियंत्रणच आणून टाकले. फक्त दोन वेळा खायचे. मध्ये मध्ये काही वाटले तरी खायचे ( चरायचे ) नाही. आणि त्या मार्गावरच वाटचाल सुरु होती. तसे आमच्या किरकोळ शरीरयष्टीकडे पाहून काही लोक सांगत होते की तुम्हाला हे करायची आवश्यकता नाही. पण आमच्यावर दीक्षितांचा प्रभाव पडला होता. त्यामुळे आम्ही सकाळी आणि चार वाजताच चहा फक्त घ्यायचो. तेवढ्या बाबतीत दीक्षितांनी आम्हाला आमच्याकडे पाहून माफ केलेच असते. पण तसे व्हायचे नव्हते. झाले असे की परवा आम्ही जरा लांबचा प्रवास करून आलो. पण प्रवासात कशाने तरी तब्येत बिघडली. तुम्ही म्हणाल खाण्यापिण्यात काही तरी गडबड झाली असावी. पण नाही हो, आम्ही काळजी घेत होतो. दीक्षितांचे म्हणणे जरी कटाक्षाने पाळले नाही तरी खाताना त्यांची आठवण करून खात होतो. आणि पिण्याचे म्हणाल तर आम्ही पाण्याशिवाय आणि चहाशिवाय दुसरे काही पीत नाही.






## आनंदी पहाट

## सेवाभावी असणे ही आध्यात्मिक संपत्ती

आधुनिक केसरी

इतरांप्रती सेवाभावी असणे ही एक आध्यात्मिक संपत्ती आहे, जी समुदाय उभारणीत योगदान देऊ शकते. काही प्रकारच्या धर्मादाय पद्धतीशिवाय आपलेपणा आणि समुदायाची भावना निर्माण करणे अशक्य आहे, असे काही जणांचे मत आहे. देणाऱ्या आणि घेणाऱ्या दोघांनाही दानशूर असण्याचे भाग्य प्राप्त होत असते. दानशूर व्यक्ती ही केवळ गरजूंनाच मदत करत नाही, तर अशी व्यक्ती स्वतःमध्ये सकारात्मक चारित्र्य आणि वर्तन विकसित करत असते, हे समजून घेतले पाहिजे. धर्मादाय कार्य तुम्हाला इतरांच्या दृष्टीकोनातून जीवन पाहण्याची संधी देते. त्यांचे संघर्ष आणि त्रास, त्यांचे विजय आणि सामर्थ्य हे आपण स्वतः अनुभवत असल्याची प्रचीती येऊ शकते. दुसऱ्याच्या आयुष्याचे साक्षीदार होणे हा एक बहुमान आहे. त्यामुळे तुम्हाला तुमच्या स्वतःच्या जीवनाबद्दल प्रशंसा आणि कृतज्ञता प्राप्त होते. माणूस म्हणून, एक सामाजिक कुळ म्हणून, आपल्याला आश्वासक वातावरणात राहण्याची गरज आहे. जिथे आपले पालनपोषण केले जाते आणि एकत्र भरभराट होऊ शकते, जिथे संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी मजबूत बांधिलकी असते. एकमेकांप्रती दानशूर असणे ही केवळ एक चांगली गोष्ट आहे असे नाही, तर मानव म्हणून आपल्या जगण्यासाठी आणि स्थानिक तसेच जागतिक समुदाय म्हणून आपल्या कल्याणासाठी हे अत्यावश्यक आहे. एक व्यक्ती बेघर असलेल्यांना आश्रयस्थान देण्याची स्वयंसेवा करू शकते, आनंदाने जेवण देऊ शकते आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकते. दुसरी व्यक्ती त्याच आश्रयाला पैसे देऊ शकते. आश्रयस्थानाच्या व्यक्तींना महिन्यातून एकदा साक्षरतेचा वर्ग शिकवून दुसरी तिचं ज्ञान आणि कौशल्य देऊ शकते. ही सर्व दानशूरता आणि सेवाभावी वर्तनाची उदाहरणे आहेत. आपण स्वतःला दुसऱ्याच्या जीवनात दयाळूपणे उपस्थित राहण्याचा अनुभव घेताना स्वतःमध्ये कृतज्ञतेचा अनुभव घेऊ शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## आता निःसंदेह | धन्य झालो ||

उणिव कर्मात | सोडु नको कधी ||
वर्म जाण आधी | प्रसंगाचे ||१||
ठेऊनिया भान | वाग निरंतर ||
भक्तीत अंतर | ठेऊ नको ||२||
शुद्ध आचरण | पाळतो सदैव |||
त्याच्या पाठी देव | उभा असे ||३||
नको प्रतारणा | आता जीवा करू ||
अहंकार मारू | याच जन्मी ||५||
होऊनिया शुद्ध | वागता संसारी ||
जन्माची ही वार | आनंदली ||५||
पूर्व पुण्याईने | लाभला हा देह ||
आता निःसंदेह | धन्य झालो ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरूपण

आधुनिक केसरी

ऐसी घरवात वाढली ।खातीं तोंडें मिळालीं ।
तेणें प्राणीयांस लागली ।काळजी उद्वेगाची ॥६॥
कन्या उपवरी जाल्या ।पुत्रास नोवर्या आल्या ।
आतां उजवणा केल्या ।पहिजेत कीं ॥७॥
जरी मुलें तैसींच राहिलीं ।तरी पुन्हां लोकलाज जाली ।
म्हणती कासया व्यालीं ।जन्मदारिद्र्यें ॥८॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्गुरु वचन अपूर्व है, भव दुख टारनिहार । ग्रहण करहु विश्वास तें, धोखा और अपार ।।११०।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/११०
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्गुरूंचे वचन (वाक्य) उपदेश अति मूल्यवान तथा महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या द्वारे सांसारिक त्रयतापांचा विनाश होतो आणि साधक-शिष्य-भक्त सर्व प्रकारांनी सुखी होतात. म्हणून सद्गुरूंचा आदेश आणि उपदेश श्रद्धा विश्वास पूर्वक ग्रहण करणे सर्व मुमुक्षु साधकांसाठी आवश्यक आहे. याच्या विपरीत आचरणाने अपार क्षति आणि मानव जीवन व्यर्थ व्यतीत होणे ध्रुव निश्चित आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## आशंकानिरूपण

आधुनिक केसरी

निराकार ज्याला कोणताही आकार नाही. म्हणजेच ज्याचे वर्णन आपण सांगू शकत नाही. असा तो निराकार. निराधार ज्याला कुणाचाही कसलाही आधार नाही तो निराधार. निर्विकल्प कोणतीही कल्पना नाही. कशातही मन गुंतून रहात नाही ते निर्विकल्प. मनाची द्विधा मनस्थिती होत नाही. आता एक बाहेर एक असा स्वभाव नसणारा. सच्चा मनाचा पवित्र मनाचा. निरामय शुध्द मन, कोणत्याही प्रकारची विषय वासना, हव्यास नसलेले पवित्र अंतःकरण असलेले ते निरामय निरागस. निराभास कोणताही भास नसलेले. फक्त दैवी चैतन्याचा अनुभव येणारे ते निराभास. मित्रांनो, आत्मा,मन आणि शरीर यांचा संगम म्हणजे माणूस. आपली बुद्धी,वाणी, शरिरातील सर्व इंद्रिये हे दृष्याहून विचार करतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## भगवंताकडे मन लावावे व देह प्रारब्धावर सोपवावा

आधुनिक केसरी

खरोखर, प्रारब्धाचे भोग कुणालाही टळत नाहीत. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो, मनाशी नाही. देहास सुखदुःख प्रारब्धाने मिळते. दुःख कोणालाही नको आहे, पण ते येते. सुखाचेही तसेच आहे. प्रारब्ध म्हणजे कृतकर्माचे फळ. हे चांगले वाईट असू शकते. सुखाचे भोग आले तर माणसाला काही वाटत नाही, पण दुःखाचे प्रसंग आले की मनुष्य म्हणतो, " मी देवाचे एवढे केले, मी अमक्या अमक्या सत्पुरुषाचा आहे, मग मला असे दुःख का भोगावे लागते ? " पण त्याला हे समजत नाही की, हा सर्व आपल्याच कर्मांचा परिणाम आहे. त्याला देव किंवा संत काय करील ? समजा, आपल्याला काही पैशाची जरूरी आहे आणि आपल्या ओळखीचा माणूस किंवा अगदी जवळचा नातेवाईक एखाद्या मोठ्या बँकेचा मॅनेजर आहे; पण आपल्या स्वतःच्या नावावर बँकेत जर पैसे नसले तर तो काहीही करू शकत नाही. फारच झाले तर तो आपल्या स्वतःच्या खिशातून काही पैसे देईल. त्याचप्रमाणे आपल्या प्रारब्धात जर सुख नसेल तर ते कुठून मिळणार



? संत फार तर जरूरीप्रमाणे आपले दुःख स्वतः सोसून आपला भार हलका करील इतकेच. म्हणून आपल्या प्रारब्धाने आलेल्या बऱ्यावाईट गोष्टी देहाने भोगाव्या आणि मनाने भगवंताचे स्मरण ठेवावे. खरा भक्त हा देहाला विसरलेला असल्याने देहाचे भोग भोगणे वा न भोगणे या दोन्हीची त्याला फिकीर नसते. म्हणून तो भोग टाळीत नाही.मनुष्याच्या देहाच्या अवयवांत जसा कमीजास्तपणा असतो, त्याचप्रमाणे मनुष्याचे विकार आणि गुण पूर्वजन्माच्या संस्काराप्रमाणे, म्हणजेच प्रारब्धाप्रमाणे, कमीजास्त प्रमाणात येतात. आपल्या देहाला होणारे भोग आपल्या कर्माचेच फळ असते, पण ते अमुक कर्माचे फळ आहे असे कळत नसल्यामुळे आपण त्याला प्रारब्ध असे नाव देतो. जगातल्या घडामोडी जशा चालतात, तशाच आपल्या सर्व गोष्टी प्रारब्धानेच चालतात. आपल्याला येणाऱ्या आपत्ती आपल्या प्रारब्धाच्या असतात; त्या भगवंताच्या नसतात; त्या पाहुण्यासारख्या असतात. त्या जशा येतात तशा जातात देखील. आपण होऊन त्या आणू नयेत, आणि प्रारब्धाने आल्या तर त्यांना घाबरू नये. प्रारब्धाची आणि ग्रहांची गती देहापर्यंतच आहे, मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही. जो संताची किंवा सद्गुरूची आज्ञा पाळतो, त्याचे प्रारब्ध हे प्रारब्धरूपाने राहात नाही. भगवंताच्या अनुसंधानाची सवय लावून घ्यावी, म्हणजे आपण प्रारब्धावर विजय मिळविल्यासारखेच आहे. **२६०. भगवंताचा जो झाला ।त्याला देह प्रारब्धावर टाकता आला ॥**

## जनार्दन स्वामी

आधुनिक केसरी

श्री राष्ट्रसंत सदगुरु जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज यांचा जन्म झाला.गुरुवार दि.२४ सप्टेंबर १९१४ शके १८३६ रोजी सकाळी ७:४५ वा दहेगाव मधील अतिशय श्रीमंत पाटील घराण्यात झाला. बाबाजींच्या वडिलांचे नाव "श्री आप्पाजी पाटील" व आईचे नाव "मातोश्री म्हाळसादेवी." तपश्चर्या कालावधी सन १९५४ ते १९६५ श्री संत जनार्दन स्वामी ( मौनगिरी ) महाराज आपल्या तपश्चर्यासाठी व अध्ययनासाठी सन १९५४/१९५५ ते १९६४-१९६५ पर्यंत नागेश्वर,ता. अंदरसूल ,जि.नाशिक मंदिरात होते. बाबाजी १८ तास सिद्धासंनात तपश्चर्या करत असत फलस्वरूप भगवान शिव शंकराने बाबाजींना साक्षात दर्शन दिले. महानिर्वाण तिथी १० डिसेंबर १९८९ मार्गशीर्ष शु ||१२ शके १९११, दि.१० डिसेंबर १९८९ च्या पहाटे ४.३५ वाजता ब्रह्ममुहूर्तावर बाबजी निजधामाला गेले.



निलंबनाची कारवाई का केली जाते ? पान 6

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २३ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



# अमृता आढाव, आयेशा शहाच्या प्रयोगाचा विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

अतुल वेताळ

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील गोळेगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गोळेगांव च्या इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी कुमारी अमृता गणेश आढाव व कुमारी आयेशा अहमद शहा यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला होता, त्यावेळी त्यांनी पर्यावरण व शेतीचा समतोल राखण्यासाठी निमार्क व दशपर्णी तयार करणे व त्याचा वापर करणे  या विषयांतर्गत सहभाग घेतलेला होता. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील एकूण  27 शाळेतील विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात आपले प्रयोग सादर केलेले होते.तीन दिवस हे प्रदर्शन चालू होते. यामध्ये अमृता व आयेशा यांनी आपल्या प्रयोगाद्वारे शेतकऱ्यांसाठी त्याचप्रमाणे संपूर्ण मानव जातीसाठी, शेत जमिनीसाठी, मातीसाठी, पशुपक्षांसाठी एकूणच संपूर्ण  निसर्गासाठी अत्यंत आवश्यक गोष्टीकडे आपल्या प्रयोगाद्वारे सर्वांचे लक्ष वेधले. या विद्यार्थिनींनी केलेला प्रयोग अत्यंत महत्त्वाचा होता. एकंदरीत शेतीची सर्व सद्य परिस्थिती पाहता रासायनिक खते व रासायनिक फवारणी यांचा अतिवापर यामुळे शेतजमिनीचे, मानवाचे, पशुपक्ष्यांचे निसर्गाचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. त्याच अनुषंगाने या विद्यार्थिनींनी फवारणीचा खर्च कमी व्हावा व घरच्या घरी फवारणीचे औषध सोप्या पद्धतीत तयार  करता यावे यासाठी निमार्क व दशपर्णी तयार करणे व त्याचा वापर करणे हा प्रयोग सुंदर रीतीने सादर केला व सोप्या भाषेत समजूनही सांगितला या प्रयोगासाठी शाळेतील सर्व सहशिक्षक व सहशिक्षिकांबरोबरच, मुख्याध्यापक, पालक यांचे मार्गदर्शन व गेल्या दोन वर्षापासून गावातील सेंद्रिय शेती करण्याबद्दलचे वातावरण..या विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरले. जिल्ह्यात विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक आल्याबद्दल विद्यार्थिनींचा पालक व शिक्षकांसह सत्कार ठेवण्यात आला. यावेळी गोळेगावच्या सरपंच ताराबाई औटे, उपसरपंच संतोष जोशी, ग्रा.पं. सदस्य उत्तम गायकवाड, ज्योती आढाव, पोलीस उपनिरीक्षक धनंजय आढाव, पोलीस पाटील आजिनाथ जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष रघुनाथ चव्हाण, नंदकुमार भालेराव, रावसाहेब आदमाने, गणेश आढाव, सुरेखा गणेश आढाव, अहमद शहा उपस्थित होते.




# खासदार निलंबन; धुळ्यात निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** केंद्र सरकारच्या हुकूमशाही राज्यकारभाराच्या निषेधार्थ आज धुळे जिल्हा काँग्रेस कमिटी आणि धुळे शहर काँग्रेसच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन करण्यात आले. लोकसभेत घुसखोरी करुन हल्ला झाला. त्यामुळे पुन्हा एकदा संसद भवनाची सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. या हल्ल्याची अधिवेशनात चर्चा व्हावी, अशी मागणी करणाऱ्या १४६ खासदारांचे नरेंद्र मोदी सरकारने निलंबन केले. हुकूमशाही पध्दतीने लोकसभा व राज्यसभा खासदारांचे निलंबन करणाऱ्या केंद्र सरकारच्या निषेधार्थ आ. कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज सकाळी १० वाजता धुळ्यात निषेध आंदोलन करण्यात आले. प्रारंभी धुळे जिल्हा व शहर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी धुळे बसस्थानकाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ एकत्र येत घोषणाबाजी करून निषेध नोंदविला.त्यांनतर धुळे जिल्हाधिकारी यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले. यावेळी निषेध नोंदवित काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर यांनी १४६ खासदारांचे निलंबत रद्द करावे, अशी मागणी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, माजी खासदार बापू चौरे, शहर काँग्रेस अध्यक्ष डॉ. अनिल भामरे, माजी आमदार डी. एस. अहिरे, तालुका काँग्रेस अध्यक्ष डॉ. दरबारसिंग गिरासे, माजी पं.स. सभापती भगवान गर्दे, साक्री तालुका काँग्रेस अध्यक्ष भानुदास गांगुर्डे, बाजार समितीचे संचालक गुलाबराव कोतेकर, रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष एन. डी. पाटील, महिला काँग्रेस अध्यक्ष गायत्री जयस्वाल, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष अलोक रघुवंशी, माजी संचालक राजेंद्र भदाणे, शहर काँग्रेस उपाध्यक्ष बापू चौरे, माजी सरपंच सोमनाथ पाटील, ज्येष्ठ नेते मुकूंद कोळवले, वानुबाई शिरसाठ, सरपंच राजीव पाटील, जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश गर्दे, तालुकाध्यक्ष हरीष पाटील, शकील अहमद, किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष शाम भामरे, जि.प. सदस्य अरुण पाटील, संचालक ऋषीकेश ठाकरे, हसन पठाण, दिलीपसिंग गिरासे, प्रल्हाद मराठे, जि.प.सदस्य प्रविण चौरे, विलास पाटील, जावेद देशमुख, सलमान मिर्झा, विश्वास बागुल, भावना गिरासे, नरेंद्र पाटील, दिपक पाटील आदींची उपस्थिती होती.

# कायदा, सुव्यवस्था, शांतता टिकून रहावी म्हणून आंदोलने, मोर्चे लोकशाही मार्गानेच व्हावेत : साहाय्यक पोलिस अधीक्षिका : स्वामी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहर व तालुका शांततेचे प्रतीक असून,येत्या काळात शहर व तालुक्यातील नागरिकांनी कोणतेही आंदोलन, उपोषण,मोर्चे हे शांतता व सुव्यवस्थेच्या अधीन राहून लोकशाही मार्गानेच करावे, असे आवाहन उपस्थित नागरिकांना शुक्रवार(ता,२२)रोजी पोलीस स्टेशन येथे आयोजित शांतता बैठकीत सहाय्यक पोलीस अधिक्षिका तथा उपविभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी यांनी केले त्या पुढे म्हणाल्या की ,आरक्षण प्रश्न असो वा अन्य कोणतेही प्रश्न असो नागरिकांनी या बाबत माहिती पोलीस व महसूल प्रशासनाला द्यावी व लोकशाही मार्गाचा अवलंब करावा,तसेच शहरात जे विविध प्रकारचे भित्तीपत्रके लावतात त्यांनी रीतसर परवानगी घ्यावी व ते विहित मुदतीत काढावे, मोबाईल वरील व्हाट्स अप चा दुरुपयोग टाळावा, मोबाईल वरील आक्षेपार्ह मजकूर खपवून घेतले जाणार नाहीअसेही त्या पुढे म्हणाल्या. आरक्षण बाबत काही गंभीर परिस्थिती उद्‌भवू नये यासाठी खबरदारी म्हणून ही बैठक घेण्यात येत आहे अअसे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीचे प्रास्तविक स्टेशन प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय नरवडे यांनी केले,सूत्र संचलन व आभार शांतता समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले,या प्रसंगी तहसीलदार सुनील सावंत यांनी ही मत व्यक्त केले ,तालुका कॉग्रेस अध्यक्ष प्रशांत सदाफळ, संजय निकम, शिवसेना प्रमुख राजेंद्र पा,साळुंके, शहर प्रमुख पारस घाटे, नगरसेवक गणेश खैरे, स्वप्नील जेजुरकर, भाजपा शहर अध्यक्ष दिनेश ढाकरे,समता परिषदचे बाळासाहेब शिंदे, मनसेचे सुनील गायकवाड, मराठा क्रांती चे मोती वाघ,सुनील बोडखे, अखिल शेख, अल्ताफ बाबा, मंजुषा ढाकरे ,राजेंद्र साळुंके, पारस घाटे यांनी वैजापूरचा जाती जातीय सलोखा राखावा व कायदा सुव्यवस्था राखावी असे विचार मांडले, रणजित चव्हाण,पो,पा, जरुळ श्रीमती सूर्यवंशी, प्रकाश शेठ बोथरा, निलेश पारख, भीमा आप्पा साखरे,अखिल कुरेशी, बाबासाहेब बहिरट, सुधीर लालसरे,रामचंद्र पिलदे ,यांच्या स,पो,नि संदीप पाटील, स,पो,नि ,पवनसिंग राजपूत,श्री मेटे यांची उपस्थिती होती.

# मतदारांसाठी ईव्हीएमचे प्रात्यक्षिक

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील पंचायत समिती  कार्यालयात सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, नागरिक यांच्यासाठी इव्हीएम मशीन व  प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. भारत निवडणूक आयोग यांच्या सूचनेनुसार सर्वत्र लोकसभेच्या निवडणुकीविषयी कामकाज सुरू आहेत. उपविभागीय अधिकारी सोहम वायाळ, तहसीलदार सारंग चव्हाण  निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार विष्णु घुगे,आमोल पाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली  मंडळ अधिकारी शेळके,तलाठी बावसकर,सहाय्यक दत्ता भवर,बिएल,ओ जयश्री तांबे,उषा गायकवाड,अनिल घोडके  यांच्या उपस्थितीत विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांना निवडणूकयंत्र याविषयी प्रात्यक्षिक दाखवून जनजागृती विषयावर माहिती देण्यात आली. निवडणुकीच्या वेळी मतदाराने आपल्या मतदान केंद्रात मतदान केल्यावर त्यास त्या यंत्रावर सात सेकंद आपण कोणाला मतदान केले याचे चिन्ह स्क्रीनवर दिसणार आहे व त्यानंतर त्याची स्लिप यंत्रामध्ये साठविली जाणार आहे. मतदार निवडणूक यंत्राचा वापर कसा करायचा, याची माहिती त्यातील प्रशिक्षक दत्ता भवर यांनी प्रात्यक्षिक करून दाखविली.





# तिसऱ्या रेल्वे लाईन बांधकाम कामगारांचे शोषण : रेल्वे अधिकाऱ्यांचे मौन

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** तिसऱ्या रेल्वे लाईन बांधकाम कामगारांचे ठेकेदार शोषण करीत असून रेल्वे अधिकारी मौन गिळवून आहेत. बल्लारशाह रेल्वे स्थानकाजवळ तिसऱ्या लाईन चे बांधकाम सुरू आहे. मुरली कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनी व माने कन्स्ट्रक्शन कंपनीकडून कंत्राटी कामगारांची होणारी कथित पिळवणूक थांबवून त्यांना न्याय देण्याची मागणी भाजपा कामगार मोर्चा चे राज्य उपाध्यक्ष अजय दुबे यांनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन देऊन केले आहे. तसेच त्यांनी केंद्रीय सहायक श्रम आयुक्त चंद्रपूर यांना सुध्दा निवेदन दिले. बांधकाम स्थळी भेट दिली असता दोन्ही कंपन्यांनी छत्तीसगड आणि झारखंड येथून आणलेल्या कामगारांना रेल्वेच्या नियमानुसार पगार, ईपीएफ सेफ्टी किट, निवास आदी सुविधा दिल्या जात नसल्याचे समोर आले.

# चिंता वाढली !

आधुनिक केसरी

करोना विषाणूचा नवीन उपपक्रार असलेल्या 'जेएन.१'चे रुग्ण देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. केरळ, महाराष्ट्र, गोव्यासह अनेक राज्यांमध्ये जेएन.१ बाधित रुग्णांवर उपचार चालू आहेत. दुसऱ्या बाजूला देशात करोनाबाधित रुग्णांची संख्यादेखील वाढू लागली आहे. संपूर्ण भारतात शुक्रवारी दुपारपर्यंत ६४० नवे करोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. एकट्या केरळ राज्यात गेल्या २४ तासांत २६५ करोनाबाधित रुग्ण सापडले आहेत. तसेच एका करोनाबाधित रुग्णाचा मृत्यूदेखील झाला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी सकाळी आठ वाजेपर्यंत देशभरात एकूण ३२८ करोनाबाधित रुग्ण सापडले आहेत. त्यापैकी २६५ रुग्ण केरळमधले आहेत. एका बाजूला केरळमध्ये करोनाबाधित रुग्णांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. तर दुसऱ्या बाजूला केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांनी म्हटलं आहे की, "सध्याची ही आकडेवारी फारशी चिंताजनक नाही. कारण, करोनाशी लढण्यासाठी आपली आरोग्यव्यवस्था सक्षम आहे." दरम्यान, केरळपाठोपाठ उत्तर प्रदेशातही करोनाबाधित रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. दिल्लीत बुधवारी केवळ चार करोनाबाधित रुग्ण होते जे गुरुवारी सात झाले आहेत. यापैकी चार रुग्ण हे अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत. दरम्यान, 'जेएन.१'चा एक रुग्ण सिंधुदुर्गात सापडल्याने महाराष्ट्रातही खळबळ उडाली आहे. या नव्या उपप्रकाराशी सामना करण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज असला तरी मागील महिनाभरापासून राज्यात करोना रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ होताना दिसत आहे. राज्यात मागील चार आठवड्यांमध्ये म्हणजेच २४ नोव्हेंबरपासून आतापर्यंत तब्बल १०२ रुग्ण आढळले आहेत. पहिल्या आठवड्याच्या तुलनेत चौथ्या आठवड्यातील करोनाबाधित रुग्णसंख्येत चार पटीने वाढ झाली आहे. सिंगापूरमध्ये गेल्या आठवड्यात ९६५ नवे करोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. त्याआधीच्या आठवड्यात ७६३ रुग्ण आढळले होते. यापैकी बहुसंख्य रुग्णांची परिस्थिती नाजूक असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार चालू आहेत. सिंगापूरमधील वृत्तपत्र 'टुडे'ने म्हटलं आहे की, या करोनाबाधित रुग्णांपैकी बहुसंख्य रुग्ण हे जेएन.१ विषाणूने संक्रमित झालेले आहेत.

# निवडणूक सुधारणा विधेयक आणि गदारोळ



डॉ.संतोष संभाजी डाखरे
संपर्क क्र.: ८२७५२९१५९६

आधुनिक केसरी

**निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीबाबत केंद्राने मांडलेले नवीन विधेयक नुकतेच राज्यसभेत मंजूर झाले आणि त्यावरून विरोधी पक्षांमध्ये गदारोळ माजला. आता या विधेयकानुसार निवडणूक आयुक्तांची निवड पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील समिती करेल, त्यात लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि केंद्रीय कॅबिनेट मंत्री सदस्य असतील.**

मुळात कायदा करणे आणि अस्तित्वात असलेल्या कायद्यात बदल करणे हा सर्वस्वी केंद्राचा अधिकार आहे. त्यानुसार केंद्राने निवडणूक आयोगाच्या नियुक्तीबाबत जर कोणता कायदा केला असेल तर त्यात एवढा गहजब माजण्याचे काय कारण. मात्र तिथेच खरी गम्मत आहे. नेमके हे प्रकरण समजून घेण्याकरिता निवडणूक आयोगाची रचना बघणे संयुक्तिक ठरेल.

या आयोगाची स्थापना १९५० मध्ये झाली होती आणि मुळात त्यात एकच मुख्य निवडणूक आयुक्त होता. १६ ऑक्टोबर १९८९ रोजी म्हणजेच १९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वसंध्येला आयोगात पहिल्यांदा दोन अतिरिक्त आयुक्तांची नेमणूक करण्यात आली, परंतु त्यांचा कार्यकाळ अत्यंत कमी होता. १ जानेवारी १९९० रोजी त्यांचा कार्यकाल संपला. १ जानेवारी १९९० रोजी "निवडणूक आयुक्त दुरुस्ती कायदा, १९८९" स्वीकारला गेला ज्याने आयोगाचे बहुसदस्यीय संस्थेत रूपांतर केले. तेव्हापासून ३ सदस्यीय आयोग कार्यरत आहे. हा आयोग बहुमताने निर्णय घेत असतो. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद अशा सारख्या मोठ्या निवडणुकांचे संचालन हा आयोग करीत असतो. निवडणूक आयोग हा निपक्ष आणि स्वतंत्र आयोग म्हणून त्याची रचना संविधानात केलेली आहे. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीबाबत संविधानात स्पष्ट उल्लेख नसल्याने देशाचे महामहीम राष्ट्रपतीच त्यांची या पदावर नियुक्ती करीत असतात. आजवर हाच प्रघात सुरु होता. मात्र २०१५ मध्ये अनुप बर्नावाल यांनी वर्तमानात अस्तित्वात असलेली निवडणूक आयुक्तांची निवड पद्धती ही सदोष आणि लोकशाहीस मारक असल्याची आणि म्हणूनच निवडणूक आयोगात पारदर्शकता यावी म्हणून निःपक्ष समितीद्वारे त्यांची नियुक्ती करण्यात यावी आणि तसे निर्देश केंद्र सरकारला देण्यात यावे अशी याचिका दाखल केली.

या याचिकेतील काही मुद्दे नोंद घेण्याजोगे आहे. त्यात असे म्हटले आहे की, निवडणूक आयुक्तांची पात्रता ठरविणारा कोणताही कायदा नसल्याने कायदेशीर पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठी न्यायव्यवस्थेने हस्तक्षेप केला पाहिजे. कारण स्वतंत्र आणि निःपक्ष निवडणुका हे लोकशाहीचे आवश्यक वैशिष्ट आहे. स्वतंत्र निवडणुका घेतल्या तरच लोकशाही कार्य करू शकते. खासदार, आमदार यांच्यावरील खटले असो, त्यांची मालमत्ता जाहीर करणे असो, बूथ कॅप्च्यरिंग किवा निवडणुकीतील भ्रष्टाचारांची प्रकरणे असो या सारख्या निवडणुकींच्या मुद्यावर सुधारणात्मक निर्णय देण्यासाठी यापूर्वीही न्यायालयाने हस्तक्षेप केला आहे.

याचिकाकर्त्यांच्या वकील प्रशांत भूषण यांनी सध्याची यंत्रणा कलम ३२४ (२) शी विसंगत असून हे कलम १४ चेही उल्लंघन करणारी असल्याचे मत व्यक्त केले होते. या आयोगावर नियुक्त करण्यात येणारे सदस्य हे बऱ्याचदा निवृत्त नोकरशहा असतात आणि ते सत्ताधाऱ्यांचे धार्जिणे असतात असाही युक्तीवाद भूषण यांनी केला होता. या याचिकेवर मार्च २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय जाहीर केला. घटनेच्या कलम १४२ (९) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने एकमताने निवडणूक आयोगाच्या सदस्यांच्या निवडीचे नियमन करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली. संसदेने कायदा होईपर्यंत शिफारशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. ज्यामध्ये पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्ष नेता आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश केला. यावेळी न्यायालयाने संविधान सभेत झालेल्या चर्चेचाही दाखला दिला. नेमनुकीबाबतचा कायदा संसदेनेच करावा याबाबत संविधान निर्मात्यांचेही एकमत झाले होते. मात्र कोणताही कायदा अस्तित्वात नसताना कार्यपालिकेने केलेल्या नियुक्त्या ह्या सत्तेचा गैरवापर करण्याचा परवानाच आहे असे मत न्यायालयाने नोंदविले होते. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आला आणि तेव्हापासूनच दिल्ली दरबारी खलबते सुरु झालीत निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीत सरन्यायाधीशांचा समावेश हा सत्ताधाऱ्यांना खटकणारा होता. आता या संदर्भात कायदा करणे अगत्याचे होऊन बसले होते. त्यामुळे तसे विधेयक बनविण्यात आले आणि नुकतेच राज्यसभेत त्यावर मोहोरही उमटविण्यात आली. हे करत असताना आम्ही या संदर्भात कायदेशीर पोकळी भरून काढत आहो असे सांगायलाही केंद्र सरकार विसरले नाही. ज्या पारदर्शकतेच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने तीन सदस्यीय समितीत सरन्यायाधीशांचा समावेश केला होता त्याच सरन्यायाधीशांना या नवीन कायद्यात डच्चू देण्यात आला आहे. (१९९० चा गोस्वामी अहवाल आणि २०१५ चा विधी आयोगाचा अहवाल या दोन्हींमध्ये सरन्यायाधीश निवड समितीचे सदस्य असावेत, असे नमूद करण्यात आले होते. हे विशेष!) त्यांच्या जागी केंद्रीय कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. पूर्वी पंतप्रधान, लोकसभेचा विरोधी पक्षनेता आणि सरन्यायाधीश अशी असलेली रचना आता पंतप्रधान, विरोधी पक्ष नेता आणि कॅबिनेट मंत्री अशी झाली आहे. नेमक्या याच बदलावर विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला आहे. यामुळे निवडणूक आयोगाचे घटनात्मक स्वातंत्र्य नष्ट होईल. अशी भीती विरोधी पक्षांनी व्यक्त कली आहे. पंतप्रधान आणि केंद्रीय कॅबिनेट मंत्री हे दोघेही सत्ताधारी पक्षांशी संबंधित असल्याने त्यांच्याच मर्जीने निवडणूक आयुक्तांची नेमणूक होईल आणि विरोधी पक्ष नेत्याला विचारातही घेतले जाणार नाही ही भीती विरोधक व्यक्त करीत आहे.

या विधेयकाच्या माध्यमातून भाजपला निवडणूक आयोगाला 'मोदी निवडणूक आयोग' बनवायचे आहे. हा निर्णय भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस आणि भारताच्या लोकशाहीवर निर्लज्ज हल्ला आणि निवडणूक आयोगाच्या घटनात्मक स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे, हे विधेयक म्हणजे राज्यघटना, न्यायव्यवस्था आणि जनतेच्या स्वतःचे सरकार निःपक्षपातीपणे निवडण्याच्या अधिकारांवर हल्ला आहे. अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते रणदीप सिंह सुरजेवाला यांनी दिली आहे. निवडणूक आयोगासारख्या स्वतंत्र पॅनेलवर नियंत्रण ठेवण्याच्या भाजपचा हा प्रयत्न असून निवडणूक आयोगाला भाजपची कटपुतली बनविण्याचा हा प्रकार आहे. अशी टीका तृणमूल काँग्रेसचे नेते साकेत



गोखले आणि सुष्मिता देव यांनी केली आहे. तर विरोधी पक्षांच्या INDIA आघाडीच्या एकजुटीला घाबरून भाजपने असे विधेयक आणल्याचे मत प्रमुख विरोधी पक्षांनी केली आहे. घटनाकारांनी निवडणूक आयोगाची रचना करताना तो स्वतंत्र आणि निःपक्ष कसा राहील यावर भर दिला होता. निवडणुका ह्या भयमुक्त आणि निकोप वातावरणात व्हाव्यात अशी त्यांची अपेक्षा होती. निवडणुकांचं आणि मतदात्यांचं स्वातंत्र्य अभाधित राहावं अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली होती. याबरोबरच खऱ्या निवडणूक स्वातंत्र्यासाठी निवडणुकांना सत्ताधारी सरकारच्या नियंत्रणापासून दूर ठेवणे आवश्यक आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले होते.

खर तर केंद्र सरकारने हे विधेयक आणून एकप्रकारे निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीच्या बाबतीत असलेली कायदेशीर पोकळी भरून काढण्याचे कार्य केले आहे. विरोधकांना मात्र हा प्रकार म्हणजे निवडणूक आयोगाला बटिक बनविण्याचा वाटत आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकींच्या पार्श्वभूमिवर आलेले हे विधेयक खरच कायदेशीर पोकळी भरून काढणारे होते की आणखी काही हे येणारा काळच सांगेल.

# उत्कर्षाची शक्ती कठीण तपस्येशिवाय अर्जित होत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपल्या मनातील इच्छा सत्यात उतरत नाही तोपर्यंत अखंडीत प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणजे तपस्या साधना असते.हि तपस्या साधना यशस्वी झाली तर जीवनाचा उत्कर्ष होईल अशी शक्ती अर्जित होते. तस पाहिलं तर जीवनाचा उत्कर्ष होईल अशी शक्ति सहजासहजी अर्जित होत नाही.त्या साठी कठिण अति कठिण तपस्या,साधना करावी लागते हि साधना तपस्या यशस्वी झाली कि मग आपला उत्कर्ष हा कोणीही रोखू शकत नाही.जीवनाचा उत्कर्ष व्हावा असं आपल्याला वाटत असतंच. फक्त असं वाटून चालत नाही.सृष्टीवर कोणत्याही प्रकारचा सन्मान सहज मिळत नाही.अर्जित केलेल्या शक्तिनुरूप आपला सन्मान होत असतो.जीवन हा भौतिक इच्छा शक्तिचा समुद्र असतो. भौतिक इच्छा या मान सन्मान अपमान या भौती फिरत असतात.**

शाश्वत इच्छा मध्ये मान सन्मान अपमान सम प्रमाणात असतो.भौतिक जीवनात मान,सन्मान मिळावा हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते.पण खरंया अर्थाने विचार केला तर आयुष्यातील हा सन्मान आपल्याला मिळण्यासाठी आपले प्रयत्न आपली साधना तपस्या हि पुर्णत्वास गेली पाहिजे. आपण आपल सामाजिक मुल्य जोपासण्यासाठी अथवा वृद्धिंगत व्हाव म्हणून प्रयत्नशिल असतो. नुसत प्रयत्नशील असून फार काही विशेष उपयोग नसतो त्यासाठी आपले प्रयत्न पराकोटीचे असले पाहिजेत.आपण अर्जित केलेलं बळ शक्ति आपल्या सन्मानाची भौतिक इच्छा पूर्ण करत असते. त्यासाठी आपल्याला आपलं सामर्थ्य निर्माण करावं लागेल.हेच सामर्थ्य सहज निर्माण होत नाही त्या साठी अहोरात्र प्रचंड मेहनत करून प्रसंगी वेळेसोबत कठिण तपस्या साधना यशस्वी करून आपल्याला आपलं धेय्य अर्जित करावं लागतं.सन्मान असो कि पुजा हि सदैव बलस्थान शक्ति,पद,सत्ता यांची होतं असते.पर्यायाने हि शक्ति ज्यांच्या कडे केंद्रीत होते तो आपोआपच केंद्रस्थानी येतो.शक्ति ताकद बळ सामर्थ्य हे विद्यमान युगात सन्मानाचे प्रतिक असल्याने आपल्याला ते अर्जित करता आलेच पाहिजे. सृष्टीवर जोपर्यंत आपल्या जवळ शक्ति बळ आहे तोपर्यंत नक्कीच आपण सन्माननीय असतो. भौतिक जीवनात लोकांना आपल्याकडं किती ज्ञान विद्वत्ता गुणवत्ता आहे याशी फार काही देणंघेणं नसतं.लोकांच आपल्या ज्ञान अज्ञानात फार रस अथवा स्वारस्य मुळीच नसत.आपण कशा पद्धतीने त्यांच्या लाभासाठी कामी पडू शकतो ती ताकद आपल्या कड आहे का हे पाहूनच लोक आपल्या आजूबाजूला फिरकत असतात.आपल्या कडे शक्ति नसेल तर लोकांसाठी आपण निरूपयोगी आहेत.जो चमत्कार दाखवेल त्याला नमस्कार करणार युग असल्याने शक्ति भौतिक जगात लोक उपयोगी ठरेल अशी शक्ति आपल्याकडं असलीच पाहिजे.आपली शक्ति बळ हे आपलं सार्वजानिक पातळीवर मुल्य ठरवतं असत.एकदा आपलं स्थान आपण आपल्या मेहनतीने निर्धारित केल कि मग लोक सन्मान करण्यासाठी लाईन लावतील पण आपलं अस्तित्व निर्माण झाल्याशिवाय सन्मान होणार नाही.भौतिक सन्मान मिळवुन देणारी शक्ति अर्जित करा.समाजात कोणत्याही व्यक्तिची पुजा सन्मान होताना अर्जित शक्ति हाच निकष सन्मानाचा असतो.त्या व्यक्तीकड अर्जित केलेलं जे पद आहे शक्ति आहे त्याची पुजा लोक करत असतात.शक्ति म्हणजे शारीरीक बळ नाही तर सामाजिक पातळीवरील सत्ता पावर हि शक्ती आपलं मुल्यमापन निश्चित करत असते.आपली शक्ति हाच आपला उत्कर्ष आहे अन्यथा आपलं जीवन व्यर्थ आहे.मानवी जीवनात खरंय अर्थाने व्यक्तिच मुल्यमापन होण गरजेच आहे.पण दुर्दैवाने असं होतं नाही.मानवी जीवनात जे काही अपेक्षित असतं त्या पासुन आपण कोसो दूर असतो. आणि जे क्षणिक असत त्याच भोवती आपण फिरत असतो.मुळात जीवन हितार्थ काय आहे हे समजणं खुप गरजेचं आहे. शाश्वत जीवन उदेश साध्य करण्यासाठी मान,सन्मान अपमान हा काही महत्वाचा भाग नाही.आत्म्याचे हित साधता आल पाहिजे.आपलं आत्महित कसं होईल हे समजलं पाहिजे आणि ते साध्य करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.हे शाश्वत जन्माच हित आहे तर भौतिक जीवनाचा विचार केला तर उत्कर्ष होण्यासाठी शक्ति अर्जित करण्यासाठी स्वतःला असं घडवा कि तुमची शक्ति तहयात तुमच्याकडे टिकून राहिली पाहिजे.जगातील सर्वात उत्कृष्ट श्रेष्ठ शक्ति अर्जित करण हे धेय्य असलं पाहिजे. आपली शक्ति हेच आपलं सामर्थ्य असतं याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करत रहा यश नक्कीच मिळेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739


# उमरगा, लोहारा येथे दूध भेसळ प्रतिबंधक कारवाई

## दूध भेसळीबाबत टोल फ्री नं.1800 22 2365 वर नागरिकांनी संपर्क साधावा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** राज्यात दुधामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याने, भेसळीमध्ये दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला रास्त दर मिळत नाही. तसेच दुध भेसळीमध्ये जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. राज्यातील जनतेला स्वच्छ व गुणवत्ता पूर्ण दुधाचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने दुध व दुग्धजन्य पदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग शासन निर्णयान्वये शासनाने जिल्हास्तरीय समिती गठीत केली आहे. जिल्ह्यातील दुध भेसळ रोखण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीने जिल्ह्यातील दुध भेसळ रोखण्याकरीता पोलिस प्रशासन, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, अन्न व औषध प्रशासन, वैद्यमापन शास्त्र तसेच जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांनी समन्वय साधून संयुक्तीक कार्यवाही करुन दुध भेसळ रोखण्यासंदर्भात नियोजनबध्द व गोपनीयतेने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार जिल्हास्तरीय दुध भेसळ समिती यांच्यामार्फत 8 डिसेंबर रोजी दुध भेसळ धडक मोहिमेंतर्गत लोहारा तालुक्यातील नेचर डिलाईट डेअरी ॲण्ड डेअरी प्रो.पो.धानुरी या केंद्रास दुध भेसळ धडक मोहिमेंतर्गत भेट दिली असता प्रथम दर्शनी गाय व म्हैस एकत्रित मिळून 6000 लिटर दूध संकलन झाले असल्याचे आढळून आले आहे. तपासणीसाठी गाय, म्हैस दुधाचे 2 नमुने घेण्यात आले आहेत. तसेच उमरगा तालुक्यातील कामधेनु दुध संकलन व कुलींग सेंटर जेवळी या केंद्रास दुध भेसळ धडक मोहिमेंतर्गत भेट दिली असता गाय व म्हैस एकत्रित मिळून 3087 लिटर दुध संकलन झाले असल्याचे आढळून आले आहे. तपासणीसाठी गाय, म्हैस दुधाचे 2 नमुने घेण्यात आले आहेत. एकंदरीत एकूण 3 नमुने सहाय्यक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन यांच्यामार्फत तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. जिल्ह्यात दुध भेसळ प्रतिबंधक समितीमार्फत दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्रेते, खाजगी व सहकारी दुध प्रक्रिया प्रकल्पधारक, सहकारी व खाजगी दुध संकलन केंद्र व



संस्था आदी ठिकाणी दुध भेसळ तपासणीसाठी मोहिम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व दुध विक्रेते, दुध संकलन केंद्र, खाजगी व सहकारी दुध उत्पादक संस्था व दुध प्रक्रिया यांनी उच्च गुणप्रतीचे भेसळ विरहीत वजनकाटे व दुध गुणप्रत तपासणी संयंत्रे नियमित प्रमाणीत करुन अद्यावत ठेवावीत. त्याचप्रमाणे दुग्धजन्य पदार्थ व पशुखाद्य आदीबाबत उत्पादन दिनांक व मुदतपूर्व वापराबाबत माहिती छापण्याविषयी सर्व विक्रेत्यांना जिल्हास्तरीय समितीने आवाहन केले आहे. तसेच दुध भेसळबाबत FSSAI टोल फ्री नं.1800 22 2365 हा उपलब्ध करुन दिलेला आहे. या टोल फ्री नंबरवरती दुध भेसळबाबत नागरीकांनी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

जिल्ह्यातील विक्रेते, खाजगी व सहकारी दुध प्रक्रिया प्रकल्पधारक, सहकारी व खाजगी दुध संकलन केंद्र व संस्था व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, दुध भेसळ हा कायद्याने गुन्हा आहे. तसेच दुधात खराब पाण्याची भेसळ केल्याने साथीच्या गंभीर आजारांचा प्रादुर्भाव होत असल्याने याला आळा घालण्याकरीता यापुढील काळात कठोर कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात नागरिकांनी जागरूक राहावे. असे आवाहन अपर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, अप्पर पोलिस अधीक्षक तसेच जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन यांच्यामार्फत तसेच समितीच्या वतीने करण्यात येत आहे.






# भव्य शंकरपटाचे 'बळीराजाच्या' हस्ते उद्घाटन

## एक लाख एकावन्न हजारांची जंगी लूट

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** जिल्ह्यातील प्रतिपंढरपूर म्हणुन संपुर्ण महाराष्ट्रात ओळखले जाणारे लोणी बु.हे गाव संत सखाराम महाराज यांच्या पावन स्पर्शाने श्रीक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी विदर्भातील सर्वात मोठी यात्रा भरते. त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने यावर्षी भव्य शंकरपटाचे आयोजन करण्यात आले आहे. रिसोड, मालेगाव विधानसभा मतदार संघाचे परमानंटअसलेले, लोकप्रिय आमदार तथा " बळीराजा " म्हणून संपुर्ण जिल्ह्यात सुपरिचित असलेले आ. अमित सुभाषराव झनक यांच्या हस्ते शंकरपटाचे उद्घाटन करण्यात आले आहे.यावेळी संस्थानचे विश्वस्त तथा सेवानिवृत्त मुख्य आयकर आयुक्त सखाराम महाराज जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकऱ्यांच्या विशेष आवडीची असलेली ही बैलगाडीची शर्यत आहे. यानिमित्ताने तब्बल एक लाख एकावन्न हजाराच्या बक्षिसांची लयलूट करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

रिसोड तालुक्यातील श्री क्षेत्र लोणी बू येथील श्री संत सखाराम महाराज यांच्या 145 व्यां पुण्यतिथी यात्रोत्सवा निमित्त लोणी बू येथे दोन दिवसीय भव्य शंकर पटाचे आयोजन करण्यात आले असून आज दिनाक 22 डिसेंबर रोजी दुपारी 1 वाजता रिसोड मालेगाव मतदार संघाचे आमदार अमित झनक तसेच श्री संत सखाराम महाराज संस्थान चे विश्वस्त माजी मुख्य आयकर आयुक्त सखा महाराज जोशी यांच्याहस्ते भव्य शंकर पताचे उद्घाटन करण्यात आले असून यावेळी नदुभाऊ मापारी,सचिन इप्पर,संतोष जाधव, आश्रूबा नवले आदीसह अनेक शेतकरी मंडळी युवक उपस्थित होते, यावेळी गट अ आणि गट क अशा दोन गटामध्ये शंकरपट शर्यत खेळवण्यास् सुरुवात झाली असून गट अ मधे प्रवेश फी 1500 रुपये तर गट क मधे 1000 रुपये प्रवेश फी ठेवण्यात आली होती यावेळी विदर्भ तसेच मराठवाडा मधून अनेक बैल गाडा शर्यत प्रेमी लोणी बू येथे दाखल झाले होते. गट अ आणि ब दोन्ही गटामिळून तब्बल एक लाख एक्कावन हजार रुपयांची बक्षिसे मिळविण्यासाठी शेकडो शंकरपट प्रेमी यावेळी मोठ्या उत्साहात यावेळी आपली बैल जोडी घेऊन स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी उपस्थित होते. दोन दिवसीय स्पर्धेमध्ये उद्या दिनाक 23 डिसेंबर रोजी बक्षिसांचे वितरण करण्यात येणार असल्याने मोठ्या संख्येने बैलगाडा प्रेमी उपस्थित होते.

# लोणंदला २३ रोजी भव्य क्रिकेटचे सामने

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** स्व.आण्णा कृष्णा शेळके पाटील यांच्या स्मृतीदिना निमित्त लोणंद ता.खंडाळा येथे क्रिकेटचे भव्य सामने आयोजित करण्यात आलेले आहेत.शनिवार दिनांक २३ डिसेंबर रोजी या सामन्याचा शुभारंभ करण्यात येणार आहे. काशिनाथ शेळके पाटील युवा मंच निंबोडी/लोणंद,संकेत शेळके पाटील मित्र परीवार लोणंद,भाऊसाहेब धायगुडे पाटील युवा मंच लोणंद आदी या सामन्याचे आयोजक आहेत.शुभारंभ प्रसंगी सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीनिवास पाटील,सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती आनंदराव शेळके-पाटील,सुवर्णगाथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.नितीन सावंत, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुशिल भोसले,नगरसेविका दिपाली संदीप शेळके पाटील,नगरसेविका राजश्री शेळके-पाटील, नागरसेविका दिपाली निलेश शेळके पाटील, निरा-वागज ग्रामपंचायतीचे सदस्य सागर देवकाते पाटील,माजी सैनिक संघटनेचे म्हस्कु अण्णा शेळके पाटील,लोणंद वि.का.स.चेअरमन मोहन शेळके-पाटील,युट्यूब लाईव्ह सौजन्य,धनगर योद्धा नवनाथ शेळके-पाटील,बागायतदार अजित धायगुडे पाटील,लक्ष्मी नारायण सप्लायर्सचे नंदकुमार शेळके-पाटील,बागायतदार मच्छिंद्र शेळके पाटील,विजय यशवंत शेळके व लोणंद पंचक्रोशीतील सर्व पत्रकार उपस्थित राहणार आहेत.या सामन्याकरिता प्रथम क्रमांकाचे ५१ हजार डॉ.नितीन सावंत, द्वितीय क्रमांकांचे ४१ हजार रविंद्र धैर्यशील शेळके,तृतिय क्रमांकाचे २५ हजार संदिप रघुनाथ शेळके,चतुर्थ क्रमांकांचे १५ हजार काशिनाथ नारायण शेळके,पंचम क्रमांकाचे ११ हजार अमोल कुंडलिक शेळके,नवनाथ गोवेकर युवा मंच कोरेगाव आदिंकडून बक्षीसे देण्यात आलेली आहेत.मैन ऑफ द सिरीज ५ हजार  दिपाली संदिप शेळके,शिस्तबद्ध संघ ४ हजार संग्राम आनंदराव शेळके,मेडन ओव्हर (फायनल) २ हजार श्रीनाथ मेन्स वेअर,सलग चार विकेट १ हजार सागर सोनावणे,सलग सहा चौकार १ हजार श्रीधरभैय्या सोनवलकर,सर्वात उत्कृष्ट झेल १ हजार शौर्य भानुदास शेळके,अनिमेश शेळके आदींकडून वैयक्तिक बक्षिसे देण्यात येणार आहेत.बाजारतळ पटांगण येथे हे सामने घेण्यात येणार आहेत.प्रवेश फी ४ हजार रुपये असणार आहे.सेमी फायनल मधील पाच संघांना टी शर्ट सौजन्य मोरया मेन्स वेअर लोणंद प्रसाद धायगुडे,स्टंप व बॉल सौजन्य रॉयल पाटील मेन्स वेअर लोणंद आकाश धायगुडे,मंडप सौजन्य मलगुंडे फनिचर मॉल लोणंद (के. टी. ग्रुप ) आदींचे सहकार्य मिळाले आहे.प्रत्येक संघात फक्त ७ खेळाडू राहतील.प्रथम येणाऱ्या ८ संघांना प्राधान्य दिले जाईल.गाववाईज १६ संघ व ओपन १६ संघ खेळवले जातील.प्रवेश फी ५०% जमा केल्याशिवाय संघ नोंदणी केली जाणार नाही. सामने ५ षटकांचे राहतील.सामन्यात बदल करण्याचा अधिकार संयोजकाकडे राहील.गैरवर्तन करणाऱ्या संघाला बाद केले जाईल.पंचाचा निर्णय अंतिम राहील.सर्व सामने युट्युबवर लाईव्ह दाखवले जातील. दिलेल्या वेळेत संघ न आल्यास बाद केला जाईल.

# सारंगखेडा घोडे बाजारात दोन हजार खरेदीदार दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** घोडे व्यापारासाठी देशविदेशात प्रसिद्ध असलेल्या नंदुरबार जिल्ह्यातील सारंगखेडा घोडे बाजाराला सुरुवात झाली असून दोन हजारांहून अधिक खरेदीदार दाखल झाले आहेत. सारंगखेडा घोडे बाजारानिमित्त आयोजित चेतक फेस्टिव्हलमध्ये घोड्यांच्या विविध स्पर्धा आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरणार आहेत. सारंगखेडा घोडे बाजाराला साडेतीनशे वर्षापेक्षा अधिकची परंपरा आहे. मागील काही वर्षांपासून आयोजकांनी या घोडे बाजाराला चेतक फेस्टिव्हलचे स्वरुप देत आधुनिक करण्याचा प्रयत्न केला आहे. यंदा बाजार सुरु होण्याआधीच खरेदी-विक्रीसाठी दोन हजारांहून अधिक घोडे दाखल झाल्याने घोड्यांच्या तंबूना जागाही उपलब्ध होत नसल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश , पंजाब, हरियाणा, गुजरात आणि यंदा प्रथमच दक्षिण भारतातूनही घोडे तबेलेमालक खरेदी-विक्रीसाठी दाखल झाले आहेत. यंदा चेतक फेस्टिव्हलमध्ये साहसी क्रीडा स्पर्धांसह शर्यत, अश्वसौंदर्य आणि अश्वनृत्य या स्पर्धा आकर्षणाचे केंद्रबिंदु राहणार आहेत. अशा स्पर्धांसाठी घोड्यांना तयार करण्याची विशेष लगबग सध्या मालकांमध्ये दिसत आहे. देशविदेशातील बाजारपेठा गाजवलेली मोरणी घोडी, मॅडोना घोडी, गोल्डन रॉक, सप्तांश, गाजीम, कसेरी, लालरतन असे किंमती घोडेही बाजारात येणार आहेत. पंधरा दिवस चालणाऱ्या या घोडे बाजारात पर्यटक मोठ्या संख्येने येण्याची शक्यता आहे.

# निलंबनाची कारवाई का केली जाते ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातले शेवटचे हिवाळी अधिवेशन चांगलंच गाजताना दिसतंय. संसदेची सुरक्षा भेदून काही तरूण लोकसभेत घुसले आणि त्यावरून आता राडा सुरू झाला. सुरक्षा व्यवस्थेमध्ये झालेल्या त्रुटीवर केंद्रीय गृहमंत्री किंवा पंतप्रधानांनी निवेदन करावं अशी मागणी करणाऱ्या विरोधी पक्षांच्या १४१ खासदारांना निलंबित करण्यात आलं. संसदेच्या कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आणि ही कारवाई करण्यात आली. यापैकी ११ निलंबित खासदारांचे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठवण्यात आले आहे.**

विशेषाधिकार समितीच्या अहवालानंतर या खासदारांवर पुढील कारवाई केली जाईल. मात्र एखाद्या विषयावर चर्चेची मागणी करणाऱ्या खासदारांवर कारवाई होण्याची ही पहिलीच वेळ नाही. मोदी सरकारच्या काळात आतापर्यंत २५५ खासदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.काँग्रेसच्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात झालेल्या निलंबनाच्या कारवाईपेक्षा हे प्रमाण ४००टक्के जास्त आहे. डॉ. मनमोहन यांच्या कार्यकाळात सुमारे ५९ खासदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.

संसदेचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी काही नियम करण्यात आले आहेत. संसदेत शिस्त पाळण्यासाठी पीठासीन अधिकाऱ्यालाही निलंबनाची कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. लोकसभेतील अध्यक्ष आणि राज्यसभेतील सभापतींना निलंबनाचा अधिकार आहे.मात्र, खासदारांच्या निलंबनानंतर सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालल्याचे फार कमी प्रसंग आले आहेत. लोकसभा अध्यक्षांना नियम ३७३, नियम ३७४ आणि नियम ३७४-अ अंतर्गत कारवाई करण्याचा अधिकार आहे. राज्यसभेचे अध्यक्ष नियम २५५ आणि नियम २५६ अंतर्गत कारवाई करू शकतात. ज्या खासदारांवर निलंबनाची कारवाई केली जाते ते संसदेच्या कामकाजात भाग घेऊ शकत नाहीत. निलंबित खासदारांना समितीच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित राहता येत नाही. निलंबन मागे घेण्याचा अधिकार फक्त अध्यक्षांना आहे. दोन्ही सभागृहांची निलंबनाची कार्यपद्धती बऱ्याच अंशी सारखीच आहे.

प्रथम, पीठासीन अधिकारी खासदाराला कोणत्याही उच्छृंखल वर्तनासाठी सभागृहातून बाहेर जाण्याचे निर्देश देऊ शकतात (LS मध्ये नियम ३७३, RS मध्ये २५५). त्यानंतरही खासदाराने सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय आणणे सुरूच ठेवले तर, पीठासीन अधिकारी त्या आमदाराच्या नावाची शिफारस करू शकतात (लोकसभा नियम ३७४, राज्यसभेत नियम २५६). त्यानंतर, सभागृह त्या खासदाराला अधिवेशन संपेपर्यंत निलंबित करण्याचा प्रस्ताव मंजूर करू शकते.

१९५२ पासून हे नियम बहुतांशी बदललेले नाहीत. २००१ मध्ये, लोकसभेने "गंभीर आणि असभ्य वर्तन" या संदर्भातही अध्यक्षांना अधिकार बहाल केले. आता नवीन नियमानुसार (नियम ३७४A), अध्यक्षांन "नाव" सूचित खासदारास आपोआप पाच दिवसांच्या कालावधीसाठी किंवा अधिवेशनाच्या उर्वरित भागासाठी निलंबित केले जाते. हा नियम निलंबनाचा प्रस्ताव सभागृहाने मंजूर करण्याची गरज नसते.

विशेष म्हणजे, राज्यसभेने आपल्या कार्यपद्धतीत ही तरतूद समाविष्ट केलेली नाही. सोमवारी राज्यसभेच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी खासदारांची नावे घेतल्यानंतर, संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

खासदारांना किती काळ निलंबित केले जाऊ शकते? सौम्य गुन्ह्यांसाठी समज देऊन किंवा ताकीद देऊन शिक्षा दिली जाते, दोन्ही शिक्षांपैकी ताकीद देण्याची शिक्षा अधिक गंभीर मानली जाते. यानंतर "(वर्तनासाठी) बाहेर पाठविण्याची" शिक्षा दिली जाते. लोकसभेच्या कार्यपद्धती आणि कामकाजाच्या नियमांमधील नियम क्रमांक ३७३ नुसारः "कोणत्याही सदस्याचे वर्तन अत्यंत असभ्य आहे असे सभापतींचे मत असेल, तर अशा सदस्याला सभागृहातून ताबडतोब बाहेर निघून जाण्याचे निर्देश दिले जावू शकतात. अशा सदस्याने तत्काळ त्याचा अवलंब करून आणि




उर्वरित दिवसाच्या कामकाजात सहभागी न होणे अपेक्षित असते.परंतु, पीठासीन अधिकाऱ्याच्या निर्देशांची अवहेलना करत राहिल्यास निलंबनाची शिक्षा होऊ शकते. सदस्याला, जास्तीत जास्त, फक्त उर्वरित सत्रासाठी निलंबित केले जाऊ शकते. शिवाय, कोणत्याही वेळी सभागृह एक प्रस्ताव पारित करून निलंबित सदस्याला पुनर्स्थापित करू शकते.अत्यंत गैरवर्तनाच्या प्रकरणांमध्ये "सदनाच्या सदस्यत्वासाठी अयोग्य व्यक्ती " अशी नोंद करून सदन एखाद्या सदस्याची हकालपट्टीही करू शकते. डॉ. मनमोहन सिंग यांच्या १० वर्षांच्या कार्यकाळात ५९ खासदारांना निलंबित करण्यात आले होते. यामध्ये लोकसभेतील ५२आणि राज्यसभेतील ७ खासदारांचा समावेश आहे. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या पहिल्या कार्यकाळात म्हणजेच २००४ ते २००९या काळात केवळ ५ खासदारांना निलंबित करण्यात आले होते. सर्वात मोठी निलंबनाची कारवाई राजीव गांधी सरकारच्या काळात १९८९ साली झाली होती. राजीव सरकारच्या काळात ६३ खासदारांना निलंबित करण्यात आले होते. इंदिरा गांधी सरकारमध्ये ३ खासदारांना सभागृहातून निलंबित करण्यात आले होते.

मोदींच्या कार्यकाळात सर्वाधिक निलंबनाची कारवाई झाली आहे. लोकसभा आणि राज्यसभेच्या आकडेवारीवर नजर टाकली तर मोदी सरकारच्या कार्यकाळात आतापर्यंत २५५ खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. २०१५ मध्ये पहिल्या मोठ्या कारवाईत तत्कालीन लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन यांनी काँग्रेसच्या २५ खासदारांना निलंबित केले होते. २०१९ मध्ये ४९ विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले होते.

कृषी विधेयक २०२० वर मतदानादरम्यान राज्यसभेतील खासदारांना निलंबित करण्यात आले होते. २०२२मध्ये महागाईवर चर्चा करणाऱ्या विरोधी पक्षांच्या २३ राज्यसभा खासदारांना सभागृहातून निलंबित करण्यात आले. त्यानंतर ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. मोदी सरकारच्या काळात काँग्रेसचे अधीर रंजन चौधरी, आपचे संजय सिंह आणि तृणमूलचे डेरेक ओब्रायन यांच्यावर सर्वाधिक निलंबनाची करण्यात आली होती.

संसद सदस्यांनी संसदीय कामकाजाचे नियम पाळललेच पाहिजे. सभागृह है चर्चेचे सर्वोच्च व्यासपीठ आहे.मात्र कामकाजा दरम्यान गोंधळ न घालता संसदीय आयुधांच्या माध्यमातून विरोधी पक्षांनी सरकारला जाब विचारावा.सरकारने देखील विरोधी पक्षांचे महत्व समजून घ्यायला पाहिजे. निलंबन करण्याआधी त्यांना समझ द्यावी,दिवस भरासाठी निलंबित करावे.संपूर्ण सत्रासाठी निलंबित केल्याने त्याचा परिणाम संसदीय कामकाजावर होत असतो.सरकारने विरोधी पक्षांचे महत्व समजून घेतले पाहिजे.सुदृढ लोकशाहीसाठी स्थिर सरकारप्रमाणेच मजबूत विरोधी पक्षाचीही आवश्यकता असते. विरोधी पक्ष सरकारच्या कामकाजावर, धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवू शकतो. संसदेमध्ये विरोधकांचा आवाज क्षीण असेल तर सरकार मनमानी पद्धतीनं कायदे बनवू शकते. विरोध पक्ष मजबूत नसेल तर सभागृहात कोणत्याही विषयावर सखोल चर्चाही होऊ शकत नाही.ही बाब सरकारने समजून घ्यायला पाहिजे.

# वैद्यकीय क्षेत्रातील त्याचे प्रेरणादायी यश...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**घरच्या आर्थिक परिस्थितीची आणि आईवडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून शिक्षण शिकलेला विद्यार्थी जीवनात नक्की यशाचे शिखर गाठतो.जे शिक्षण शिकायचे ते एकाग्रतेने ग्रहण केल्यानंतर आणि जीवनातील ध्येय गाठण्यासाठी एकाग्रतेने सतत प्रयत्नशील राहिले की जीवनाचे सोने व्हायला वेळ लागत नाही. हे ध्यानात ठेवून आणि जिद्दीने त्याने शिक्षणात असेच यश संपादन केले आहे.त्याचे नाव आहे डॉ.सतिश भागवत कांबळे. तो लहानपणापासून अतिशय जिद्दी आणि हुशार मुलगा. त्याचे आईवडील मोलमजुरी करणारे.**

त्याचे घर साधारण दर्जाचे असे तसेच अगदी लहानसे.घरात कोणी जास्त शिकलेले नाही.चार बहिणी आणि दोन भाऊ असा त्याचा मोठा परिवार.घरातील सदस्यांमध्ये तो सगळ्यात लहान.दिसायला चुणचुणीत आणि अभ्यासात हुशार.घरात शिक्षणाचे कसलेही वातावरण मुळीच नाही.तरीही तो शिकतो,एकाग्रतेने अभ्यास करतो. एकेक इयत्ता उत्तीर्ण होतो ते ही अगदी चांगल्या गुणांनी. बारावी सायन्स नंतर तो वैद्यकीय क्षेत्रात जाण्यासाठी नीट या परीक्षेची तयारी करतो.आणि आज त्याने जे लक्षणीय व प्रेरणादायी यश संपादन केले आहे ते इतरांना प्रेरणा देणारे तर आहेच.परंतु, जीवनात इतरांपेक्षा वेगळे काही तरी लक्षवेधी कार्य करण्यासाठी दिशादर्शक बाब आहे.

होय,हे अगदी खरे आहे की केवळ मोलमजुरी करणाऱ्या आईवडिलांच्या पाठबळावर त्याने बी.डी.एस.चे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आहे आणि आता भुवनेश्वर एम्स येथे एम.डी.एस.तसेच आर्थोडॉंटिक्स ॲन्ड डेन्टोफेसिएल ऑर्थोपेडिक अभ्यासक्रमासाठी त्याला प्रवेश मिळाला आहे.हा अभ्यासक्रम पूर्ण करताना त्याला दरमहा सव्वा लाख रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे.त्याने आज जे यशाचे शिखर गाठले आहे ते असाधारण व भल्या भल्यांना न जमणारे आहे. हे यश मिळवणाऱ्या त्या तरुणाचे नाव आहे सतिश भागवत कांबळे.गाव खंडाळी ता.अहमदपूर, जि.लातूर. त्याचे चौथी पर्यंतचे शिक्षण जि.प. प्राथमिक शाळा वामननगर खंडाळी या शाळेत झाले तर पाचवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण त्याने जि.प.प्रशाला खंडाळी या शाळेतून घेतले.अकरावी व बारावी सायन्स चे शिक्षण त्याने अहमदपूर येथील महात्मा गांधी कॉलेजमधून पूर्ण केले.हे शिक्षण त्याने आईवडिलांकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशावर पूर्ण केले आहे. शिक्षण शिकायचे तर मन लावून असा त्याचा दृढनिश्चय होता.याच आशावादाच्या बळावर त्याने बारावी विज्ञान पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.वैद्यकिय



अभ्यासक्रमाला प्रवेश मिळवण्यासाठी त्याने नीट परीक्षा दिली. आणि मुंबई येथील जे.जे.हॉस्पिटल आणि शासकीय दंत महाविद्यालयात बी.डी.एस.ला त्याचा नंबर लागला.हा अभ्यासक्रम त्याने ठरलेल्या वेळेत यशस्वीरित्या पूर्ण केला.मग तो बेंगलोर येथे आय.एन.आय.सीईटी परीक्षा नोव्हेंबर २०२३ च्या तयारी साठी गेला.त्याने ही परीक्षा दिली.त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला.सतिशने त्या परीक्षेत ऑल इंडिया रँकींगमध्ये २०० वा क्रमांक व मागासवर्गीयांमध्ये चौथा क्रमांक पटकावला.याच परीक्षेतील यशाच्या आधारे त्याचा पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी ओडिसा राज्यातील एम्स भुवनेश्वर येथे नंबर लागला आहे.अत्यंत प्रतिकुल परिस्थिती असूनही सतिशने मिळवलेले हे यश नक्कीच लक्षणीय आणि गौरवास्पद आहे.भविष्यामध्ये तो वैद्यकीय क्षेत्रात आणखी असेच लक्षणीय यश मिळवणारे आहे याबाबत दुमत नाही.पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी सतिशला मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!तो आमच्या जिल्हा परिषद शाळेचा माजी विद्यार्थी आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.डॉ.सतिश भागवत कांबळे याच्याकडून प्रेरणा घेऊन आमच्या शाळेतील इतर विद्यार्थ्यांनी असेच लक्षवेधी व प्रेरणादायी यश मिळवावे हीच शुभकामना!

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी. व्ही. नरसिंहराव

आधुनिक केसरी

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुणयतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५



निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# कॉ. अण्णा भाऊंचे सहकारी कॉ. मुर्गप्पा खुमसे



डॉ. मारोती द. कसाब
संपर्क क्र. 9822616853

आधुनिक केसरी


**स्वातंत्र्याच्या काही वर्ष आधी मराठवाड्याची पुरती दैना झालेली होती. १९४० ते ५० या दशकात निजामशाहीलाही उतरती कळा लागली होती. आपल्या राज्यकारभारावरचे निजामाचे नियंत्रण उडाले होते. प्रशासन पूर्णपणे जमीनदार- सरंजामदार आणि भांडवलदार यांच्या हातात गेलेले होते. कर वसुलीसाठी नेमलेले पाटील पांडे त्याला जड झाले होते. तिकडे देशभर स्वातंत्र्याची चळवळ सुरू होती आणि त्याच काळात निजाम आपले राज्य कायम ठेवण्यासाठी वाटेल ते करायला उतावीळ झालेला होता आणि याचाच फायदा रझाकारांनी घेतला.**

निजाम हैदराबादेत बसून रजाकारांवर आणि हजारो एकर जमिनी बळकावून गढ्या बुरुजावर डोमकावळ्यांसारखे बसलेल्या पाटील- पांड्यांवर अवलंबून राहिला. सामान्य जनता रझाकारांनी आणि सरंजामदारांनी अक्षरक्षः पिळून काढली.म्हणूनच स्वामी दयानंद सरस्वतींची आर्य समाज चळवळ मराठवाड्यात सुरु झाली. आर्य समाजाच्या 'सत्यार्थप्रकाश' या ग्रंथाच्या अकराव्या अध्यायावर निजामाने बंदी घातली. या काळात आर्य समाजाला दलित व बहुजन समाजातून मोठा अनुयायी वर्ग लाभला, कारण आर्य समाजाने जातीपाती मोडण्याचे, अस्पृश्यता नाकारून मानवतादाचे कार्य सुरू केले होते. अखिल भारतातून आर्यसमाजी कार्यकर्ते मराठवाड्यात येत होते. त्याच वेळेस शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही मराठवाड्यावर लक्ष केंद्रित केले. मराठवाड्याच्या सीमेवर कसबे तडवळे मुक्कामी त्यांनी २२ व २३ फेब्रुवारी १९४१ हे दोन दिवस थांबून ' महार मांग वतनदार परिषद ' घेतली. याच काळात मराठवाड्यात कम्युनिस्ट विचारांची मंडळीही कामाला लागली.दलित, शेतकरी- कष्टकऱ्यांच्या एकजुटीसाठी शाहीर अमर शेख, द.ना. गवाणकर, विश्वासराव फाटे, शाहीर जंगमस्वामी , शाहीर लहरी हैदर अशी मंडळी मराठवाड्यात येत होती आणि त्याचवेळी ज्यांची प्रतिभा कष्टकरी शेतकऱ्यांच्या बाजूने तलवारीसारखी तळपत होती असे लोकशाहीर, साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे हे ही मराठवाड्याशी जोडले गेले होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासाठी अण्णा भाऊ पहिल्यांदा १९४९ च्या सुमारास मराठवाड्यात आले होते. " बेळगाव, कारवार, डांग, निपाणी, भालकी - बिदरसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे " , या मागणीसाठी अण्णा भाऊंसह कैक शाहीरांनी आणि कलावंतांनी अक्षरक्षः जीवाची बाजी लावली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबरोबरच मराठवाड्यात डाव्या पुरोगामी नेत्यांचा शिरकाव झाला. राज्यात काँग्रेस हा एकाच वरचढ जातीचा पक्ष असून, तो बहुजनांना न्याय देऊ शकणार नाही या भूमिकेतून ब्राह्मणेतर चळवळीचे नेते एकत्र आले. त्यांनी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला.

भारतात कम्युनिस्ट पक्षाने आपले कार्यकर्ते सर्वत्र निर्माण केले. अण्णा भाऊ साठे हे कम्युनिस्ट पक्षाचे कार्ड होल्डर कार्यकर्ते होते. त्यामुळे तेही मराठवाड्यात आले. मराठवाड्यात शेतकरी, कष्टकऱ्यांची आणि दलितांची एकजूट करण्यासाठी अण्णाभाऊंनी जवळ जवळ तीन चार महिने मराठवाड्यात वास्तव्य केले. अण्णा भाऊंच्या मराठवाड्यातील वास्तव्याचा आणि कामगिरीचा शोध घेताना अण्णाभाऊंचे एक तत्त्वनिष्ठ सहकारी कॉम्रेड मुर्गप्पा खुमसे हे लातूर जवळच्या रेणापूर येथे राहायला असल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी यांच्याकडून समजली. त्यामुळे रविवार दि. ८ मार्च २०२१ रोजी ठरवून आम्ही रेणापूर गाठले. रामराव गवळी आणि मी सकाळीच अप्पांच्या घरी पोहोचलो. कम्युनिस्ट पक्षाचा जुन्या पिढीतील निष्ठावान कार्यकर्ता कसा असतो, याचं उत्तम उदाहरण म्हणजे स्वातंत्र्य सेनानी कॉम्रेड मुर्गप्पा खुमसे..!

दोन-अडीचशे वर्षांपूर्वी कर्नाटकाच्या विजापूर जिल्ह्यातील खुमसगी या गावचे एक लिंगायत कुटुंब स्थलांतरित होऊन लातूर जवळच्या रेणापूर येथे येऊन स्थिरावले. मुर्गप्पांचे वडील काशिनाथप्पा सातप्पा हे कसलेले पहिलवान होते. त्यांनी स्वकष्टाने शेती घेतली. मुर्गप्पा हे वयाच्या २१ वर्षांपर्यंत आपल्या आई-वडिलांना एकुलते एकच होते ; त्यानंतर त्यांना एक भाऊ झाला. मुर्गप्पांचा जन्म १४ एप्रिल १९२१ रोजी झाला. मात्र जेव्हा त्यांना अंबाजोगाईच्या राष्ट्रीय विद्यालयात दाखल करण्यात आले, तेव्हा त्यांची जन्मतारीख १४ एप्रिल १९२६ अशी नोंदवली गेली. अंबाजोगाई हे तेव्हा बीड जिल्ह्यातील 'मोमिनाबाद ' म्हणून ओळखले जात होते. तिथे स्वामी रामानंद तीर्थ आणि त्यांचे धाकटे बंधू बेथुजी गुरुजी खेडगीकर , बाबासाहेब परांजपे आदींनी राष्ट्रीय विद्यालय सुरू केलेले होते. या शाळेतील वातावरण देशप्रेमाने भारावलेले होते.मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले विद्यार्थी आपले दुःखद जीवन अनुभव सांगत होते. सरंजामदार आणि रझाकारांच्या छळाच्या कहाण्या ऐकून मुर्गप्पांचे बंडखोर मन पेटून उठले.१९४२ ला देशभर चलेजाव चळवळ सुरू झाली. याच काळात झेंडा सत्याग्रह केला म्हणून मुर्गप्पांना अटक झाली. बर्दापूरच्या गढीवर त्यांनी तिरंगा फडकवला. लातूरच्या दयाराम रोडवरील सरकारी पोस्ट खात्याच्या बोर्डावर काळ्या डांबराने स्वातंत्र्याच्या घोषणा लिहिल्या होत्या.



सातवीला असतानाच भारतीय स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना पहिल्यांदा दोन दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला. त्यानंतर भूमिगत झाल्यामुळे त्यांना शाळा कायमची सोडावी लागली. अगदी तारुण्यात मुरगप्पा हे आर्य समाजाच्या संपर्कात आले. त्यामुळे त्यांचा देवाधर्मावरचा आणि खुळचट रूढी परंपरांवरचा, माणसात भेदभाव निर्माण करणाऱ्या जाती व्यवस्थेवरचा विश्वास उडाला. ते कट्टर विज्ञानवादी, नास्तिक आणि विवेकनिष्ठ बनले. ते शेवटपर्यंत आपल्या परिवर्तनवादी विचारांवर ठाम राहिले. त्यांच्या घरात कुठेही देवाधर्माचा फोटो दिसला नाही की, अंगावर गंडा दोरा. आम्ही भेटलो तेव्हा शंभरीच्या उंबरठ्यावर असलेले मुर्गप्पा हे सळसळत्या चैतन्याचे मूर्तिमंत उदाहरण दिसले. या वयातही ते पहाटे लवकर उठत. थंड पाण्याने आंघोळ करत. व्यायाम करत आणि साधा आहार घेत. सातत्याने गोरगरिबांच्या बाजूने विचार करणारे कॉम्रेड मुर्गप्पा खुमसे हे शंभरीतही चष्म्याशिवाय वाचन करत, लिहित. मशिन शिवाय ऐकत. आम्ही त्यांच्या भेटीसाठी गेलो तेव्हा त्यांनी संभाव्य मुलाखतीची तयारी करून ठेवली होती. काही मुद्दे त्यांनी स्वतःच्या अक्षरात लिहून ठेवले होते. गेल्यागेल्या चहापाणी झाल्यानंतर ओळखीपाळखी झाल्या. थोडीशी बातचीत झाली. त्यानंतर मध्येच त्यांनी आग्रहाने आम्हाला जेवायला बसवले. तेही आमच्या सोबत खाली बसून जेवले. ते लढवय्ये कार्यकर्ते होते ; तसेच हळव्या मनाचे कवीही होते. दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करणाऱ्या पंजाब हरियाणा येथील शेतकऱ्यांच्या बाजूनं नुकतीच लिहिलेली एक कविता त्यांनी आम्हाला वाचून दाखवली. चार-पाच तासांच्या आमच्या भेटीत आप्पा सारखं बोलत होते. किती सांगू आणि किती नको असं त्यांना झालं होतं. चळवळीचा विषय निघाला कि आप्पांच्या अंगामध्ये इन्किलाब संचारायचा.

आप्पांची संपूर्ण जडण-घडण आम्ही ऐकून घेतली. स्वातंत्र्याच्या चळवळीत लढलेला हा सच्चा कॉम्रेड. सुभाषबाबूंच्या आणि क्रांतिसिंह नाना पाटलांच्या विचारांनी भारावलेला. इंग्रजांच्या तुरुंगातून एका पानगावच्या गालफाडे नावाच्या मातंग तरुणाच्या सहाय्याने जेलचे गज कापून आप्पांनी आपल्या सहकाऱ्यांना घेऊन धूम ठोकली होते. पोलिसांच्या बंदुका पळवल्या होत्या. पोलिसांच्या हातावर तुरी देऊन अनेक वर्ष भूमिगत आयुष्य कंठले होते. स्वातंत्र्यानंतर आप्पांनी विविध सामाजिक आंदोलनांमध्ये भाग घेतला. ' समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र' या स्वप्नाच्या पूर्तीसाठी आप्पा झटत होते. १९५३ सालच्या जानेवारी महिन्यात ११ तारखेला मुंबईतील दादरच्या वनमाळी हॉल मध्ये झालेल्या लोकनाट्य परिषदेत अण्णाभाऊंची पहिल्यांदा भेट झाली. या परिषदेत महामहोपाध्याय द.वा. पोतदार आणि न. र. फाटक हे प्रमुख पाहुणे होते. तिथेच अण्णाभाऊंची शाहिरी ऐकून आपण अण्णाभाऊंच्या प्रेमात पडलो असे अप्पा सांगतात.

आधी आर्यसमाजी, नंतर स्टेट काँग्रेसचे, त्यानंतर पीडीएफचे कार्यकर्ते असलेले मुर्गप्पा हे नंतर कट्टर कम्युनिस्ट बनले ते अण्णा भाऊ साठे यांच्यासारख्या शाहीरांमुळेच. अप्पांनाही शाहिरीचा छंद लागला. अगदी आजही आप्पा कविता करतात. 'माझे जीवन गाणे' हे त्यांचे काव्य प्रसिद्ध आहे. त्यांच्या कवितांचा एक संग्रहही प्रसिद्ध झाला आहे. अण्णाभाऊंच्या अनेक आठवणी यावेळी अप्पांनी सांगितल्या. अहमदपूर जवळच्या खानापूर या गावचे कॉम्रेड विठ्ठलराव देशपांडे हे हैदराबाद येथे वकिलीचे शिक्षण पूर्ण करून आले होते. त्यांनीच रेणापूर जवळच्या मोहगाव येथे कम्युनिस्ट चळवळीतील शाहिरांच्या प्रशिक्षणाचे शिबिर ठेवले होते. या शिबिरासाठी अण्णाभाऊ हे त्यांच्या कलापथकासह मुंबईहून आले होते. या शिबिरात जवळपास शंभर कलापथकांनी सहभाग घेतला. शिबीर संपल्यानंतर जवळच्याच कामखेडा या गावात गावकऱ्यांनी अण्णाभाऊंच्या शाहिरीचा मोठा कार्यक्रम ठेवला होता. कामखेडा हे मुर्गप्पांचं आजोळ. मोहोगावहून अण्णाभाऊ पायी पायी चालत कामखेडा येथे आले होते. तेथील कॉम्रेड पांडुरंग गुडे ( माजी साखर आयुक्त के.ई. हरिदास यांचे सासरे ) यांच्या वाड्यात अण्णा भाऊंनी आपल्या कलापथकासह मुक्काम केला. कामखेड्यात झालेल्या कार्यक्रमाला लातूर, बीड परिसरातून लोक बैलगाड्या जुंपून आले होते. रात्र भर अण्णाभाऊंची शाहिरी चालू होती. अण्णाभाऊंच्या प्रेरणेतून लातूर परिसरात सामाजिक प्रबोधनाचा जागर घालणारी अनेक कलापथके उदयाला आली. आम्हीसुद्धा त्यांच्या प्रेरणेतून ' मराठवाडा कलापथक' काढले होते, असे कॉम्रेड मुर्गप्पा खुमसे यांनी आम्हाला प्रदीर्घ मुलाखत देताना सांगितले होते. कामखेड्याची शाहिरी परिषद संपल्यानंतर एक दिवस मुद्दामहून अण्णाभाऊ आपल्या कला पथकासह रेणापूर येथे मुर्गप्पांच्या वाड्यात मुक्कामाला राहिले.

'आमच्या लिंगायत गल्लीत सगळी काँग्रेसला माणणारी मंडळी. आमचंच घर लाल बावट्याचं. आमच्या घरी एक मोठा शाहीर आणि लेखक मुक्कामी आलेला आहे हे कळताच अण्णाभाऊंना पाहण्यासाठी गावातील अनेक लोक जमले होते. माझ्या घरी साधी भाजी भाकरी अण्णाभाऊंनी खाल्ली याचा मला खूप आनंद झाला' , असे आवर्जून अप्पांनी सांगितले. दुसऱ्या दिवशी आम्ही बैलगाड्या जुंपून अण्णाभाऊंना लातूरला पोहोचविले. तिथे दयाराम रोडवर आप्पाराव गवळी हा कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता स्वतः सलून चालवत होता. त्याच्या सलूनवर जाऊन अण्णा भाऊंनी दाढी केली. गवळीच्या दुकानात कार्ल मार्क्स, लेनिन आदी कम्युनिष्ट नेत्यांचे फोटो पाहून अण्णाभाऊंना खूप आनंद झाला. त्यानंतर आम्ही अण्णा भाऊंना लातूर रेल्वे स्टेशन वरून मिरज गाडीने मुंबईला पाठवून दिले, ही आठवण मुर्गप्पा मन लावून सांगत होते.

त्यानंतर त्यांची अण्णाभाऊंशी भेट मुंबईत अनेकदा झाली. अण्णाभाऊ बरोबर अनेकदा गप्पा मारण्याचा योग आला तेव्हा अण्णाभाऊ आपल्या पूर्वायुष्यातील गोष्टी सांगत असत. १९५२ साली मुंबईतील संयुक्त मतदार संघात लोकसभेच्या जागेसाठी कॉ. डांगे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर उभे होते. अण्णा भाऊंनी डांगे यांचा प्रचार केला. डांगे यांची निवडणूक निशाणी रेल्वे इंजिन होती. तेव्हा अण्णा भाऊंनी एक गाणं तयार केलं होतं.

**" डांगे ड्रायव्हर मिळालाय बाका**
**मतं इंजिनाच्या पेटीत टाका"**

असं ते गाणं होतं. अण्णाभाऊ प्रत्येक निवडणुकीला समितीचा, कम्युनिस्ट पक्षाचा. प्रचार करण्यासाठी बीड, उस्मानाबाद जिल्ह्यात येत असत. याकाळात अण्णाभाऊंचे वास्तव्य बरेच दिवस अहमदपूर जवळच्या धसवाडी येथे होते. साकोळ जवळगा, माळेगाव यात्रा, उदगीर, अहमदपूर, लातूर ,भालकी ,बिदर अशा अनेक गावांमध्ये अण्णाभाऊंच्या सभा झाल्या. गोवा मुक्तिसंग्राम आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आम्ही सोबत काम केले ही आठवणही कॉम्रेड मुर्गप्पा खुमसे यांनी सांगितली.

अण्णाभाऊ हाडाचे कलावंत होते. तसेच ते निष्ठावंत कॉम्रेड होते. त्यांच्याकडे अफाट प्रतिभाशक्ती होती. बसल्या बसल्या ते गाणी लिहित. स्वतःच गाण्यांना चाली लावत. या चाली बहुदा लोक गीतांच्या असत. अण्णा भाऊंचा स्वभाव एका जागी थांबण्याचा नव्हता. ते सतत घाईगडबडीत असत. शेवटी आयुष्याचीही त्यांनी घाईच केली, हे सांगताना अप्पांना गलबलून आले होते. अण्णाभाऊंच्या स्वभावाचे अनेक पैलू यावेळी आप्पांनी आम्हाला उलगडून दाखविले. या मुलाखतीत अण्णाभाऊंचे " दौलतीचा राजा उठून सर्जा हाक दे शेजाऱ्याला रे
शिवारी चला " हे संपूर्ण गीत त्याच आवेशात आणि आवेगात त्यांनी आम्हाला गावून दाखवले. आप्पा अण्णा भाऊमय झाले होते. अण्णा भाऊंनी आपल्या घरादाराचा विचार न करता संपूर्ण जीवन लोकसेवेला वाहिले म्हणूनच ते महान होते ,असेही या मुलाखतीच्या शेवटी आप्पा म्हणाले. वयाची शंभरी पार करूनही अप्पा आरोग्य संपन्न जीवन जगले. चार वर्षांपूर्वी ज्यांनी आप्पांना चळवळीत अखंड साथ दिली त्या त्यांच्या सहचारिणी निर्मलाबाई यांचे निधन झाले. आप्पांचा एक मुलगाही ऐन उमेदीच्या काळात वारला. मात्र या धक्क्यांतूनही आप्पा सावरले ते केवळ लोक चळवळीमुळे. लोकांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने लढे उभे केले. 'आपलं कसं होईल ' हा प्रश्न त्यांना कधीच पडला नाही; लोकांचं कसं होईल? हाच विचार ते शेवटपर्यंत करीत होते.

अप्पांवर बुद्ध-बसव- फुले-शाहू-आंबेडकर, गाडगेबाबा- अण्णा भाऊंचे संस्कार झालेले होते. एकदा रेणापूर ग्रामपंचायत आप्पांनी लढवली आणि जिंकली. लोकांनी पैसेही दिले आणि मतही दिले. मात्र नंतरच्या निवडणुकांमध्ये आप्पांनी फक्त डाव्या पक्षांच्या उमेदवारांचा प्रचार केला.

त्यांना भारत सरकारने स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाबद्दल ताम्रपट देऊन गौरविले आहे. लातूर येथील पत्रकार महारुद्र मंगनाळे यांनी त्यांच्या छायाचित्रांचे आणि पत्रांचे संकलन करणारा एक संदर्भग्रंथ संपादित केला आहे.

आपल्या जीवनात आप्पांनी अनेक स्थित्यंतरे पाहिली. अनेक चळवळी पाहिल्या. ते कम्युनिस्ट असले तरी पोथीनिष्ठ कम्युनिस्ट नव्हते. मुळात ते मानवतावादी होते. सत्यवादी होते.जेव्हा जेव्हा जनतेवर अन्याय झाला, तेव्हा तेव्हा आप्पांनी त्या विरुद्ध आवाज उठविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव मराठवाडा विद्यापीठाला मिळालं पाहिजे या मागणीसाठी त्यांनी सत्याग्रह केला. जेल भोगली. त्याचबरोबर लिंगायत धर्माला स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळाली पाहिजे, यासह अनेक न्याय्य मागण्यांसाठीही आप्पांनी आंदोलने केलेली आहेत.

सामान्य जनतेच्या, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या हितासाठी शेवटपर्यंत त्यांचे रक्त सळसळत असायचे. अन्यायाविरुद्ध त्यांची वाणी आग ओकायची.आज दि. २१ डिसेंबर २०२३ रोजी त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्य चळवळीतील एक धगधगते अग्निकुंड निमाले. जनतेच्या प्रश्नांसाठी जागरूक असलेला एक नेता आपल्यातून निघून गेला... स्वातंत्र्य सेनानी कॉम्रेड मुर्गप्पा खुमसे यांना भावपूर्ण आदरांजली...अखेरचा लाल सलाम..!!

# तुकडोजी महाराज युवक विचार मंच चौथे राज्यस्तरीय अधिवेशन




हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचाचे चौथे राज्यस्तरीय अधिवेशन महारुद्र यज्ञ भूमी सालबर्डी येथे मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे ही अत्यंतिक आनंदाची बाब आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अभूतपूर्व नियोजनातून पार पडलेल्या न भूतो न भविष्यती अशा ऐतिहासिक यज्ञात ८० एकर जमिनीवर विशाल मंडप, चंद्रपूरच्या लोकांनी मंडपाची व्यवस्था केली, १० गावच्या लोकांनी गंध लावण्याचे काम केले. ४८ व्यवस्था समित्या, ७००० प्रमुख कार्यकर्ते, १०,४४७ स्वयमसेवक, ७०००मजूर, मंडपात चाळीस हजार लोक बसतील अशी व्यवस्था.**

एक पंगत ९०,००० अशा रोज चार पंगती बसत, ५००० वाढणारे, ५००० पत्रावळी उचलणारे, ३०००स्वयंपाकी, यज्ञाला डेप्युटी कमिशनर वॉटसन साहेबांची भेट. या अभूतपूर्व नियोजनामुळे महाराजांची संपूर्ण महाराष्ट्रात कीर्ती पसरली आणि त्यातून महाराजांनी स्वातंत्र्याचा लढा महाराष्ट्रामध्ये उभारला अशा या यज्ञ भूमीत हे अधिवेशन होत असल्यामुळे या अधिवेशनाला वेगळेच महत्त्व प्राप्त झालेले असून या ऐतिहासिक स्थळी जाण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे. १जानेवारी २०१५ रोजी अमरावती जिल्ह्यातील तीवसा येथे अमर वानखडे या सळसळत्या रक्ताच्या आणि जिवंत हृदयाच्या तरुणाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या क्रांतिकारी विचाराने झपाटलेल्या आपल्या काही निवडक तरुणांना सोबत घेऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचाची स्थापना केली. तेव्हापासून गेल्या ८ वर्षात संपूर्ण महाराष्ट्रातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचाराने प्रेरित विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या आणि महाराष्ट्रातील समविचारी संघटनेतील तरुणांची फळी निर्माण करण्यात विचार मंच यशस्वी झाला आहे. मागील वर्षी सेवाग्राम येथे राष्ट्रसंत आणि राष्ट्रपिता यांच्या प्रदीर्घ भेटीच्या ८६ वर्ष पूर्तीनिमित्त विचार मंचाचे तिसरे राज्यस्तरीय भव्य अधिवेशन अत्यंत उत्साहात आणि थाटात पार पडले. अशाप्रकारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये पोहोचविण्यासाठी विचार मंच कार्यरत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचाराचा लाखो लोकांवर प्रभाव आहे. त्यातील अनेक तरुणांमध्ये विविध प्रकारचे कौशल्य व बुद्धिमत्ता असून सुद्धा कुठेही संधी



उपलब्ध होत नाही. अशा कर्तृत्ववान तरुणांना विचार मंचाने विविध क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. वर्षभर विचारमंचाच्या माध्यमातून देहदान,अवयव दान या संदर्भात जनजागृती त्याचबरोबर महापुरुषांची जयंती पुण्यतिथी व विचार मंचातील पदाधिकाऱ्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आरोग्य शिबिर तथा रक्तदान शिबिराचे आयोजन त्याचबरोबर दिवाळी सारख्या सणाच्या निमित्ताने रुग्णांना फळ वाटप तथा औषधी उपलब्ध करून देणे इत्यादी विधायक कार्य विचार मंचाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. विचार मंचाच्या अंधश्रद्धा निर्मूलन विभागा मार्फत विद्यार्थी पालक समुपदेशन हा ऑनलाइन घेतलेला कार्यक्रम अतिशय प्रसिद्ध असून समाजाचे मानसिक आरोग्य राखण्यासाठी आणि निराश हताश तरुणांना पुन्हा उठून उभं करण्यासाठी विचार मंचाने तरुण एक जुटीने एक दिलाने काम करत आहे. या अधिवेशनात महाराष्ट्रातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे. तसेच जिजाऊ ब्रिगेड प्रदेशाध्यक्षा शिवमती सीमाताई बोके, मा. विघे गुरुजी अध्यात्म गुरुकुलचे संचालक रविदादा मानव, सुप्रसिद्ध लेखक तथा विचारवंत प्रेम कुमार बोके या मान्यवरांच्या उपस्थितीत दोन दिवस वेगवेगळ्या सत्रात कार्यकर्त्यांना वैचारिक मेजवानी मिळणार असून विविध विषयांवर चर्चा घडवून येणार आहे. वरील मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून श्री गुरुदेव चळवळीत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

त्यामुळे ज्या तरुणांना आपल्या कलागुणांचा विकास करायचा असेल आपला नावलौकिक वाढवायचा असेल त्या सर्व तरुणांनी दिनांक २३,२४ डिसेंबर ला सालबर्डी येथे होऊ घातलेल्या राज्यस्तरीय अधिवेशनात सहभागी व्हावे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा परिवर्तनवादी विचार संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशात पोहोचविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे हीच या अधिवेशनाच्या निमित्ताने अपेक्षा माझ्या सर्व सहकारी बंधू भगिनींना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंच चौथ्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या अनंत कोटी शुभेच्छा.

# हिंदुस्तान अँटिबायोटिक्स लिमिटेडचा सिकल अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड सोबत काम करण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हिंदुस्तान एंटीबायोटिक्स लिमिटेड ने ऐतिहासिक पाऊल टाकत अकुम्स ड्रग्स एंड फार्मास्यूटिकल्स लिमिटेडच्या महत्वपूर्व योगदानात सिकल सेल आजाराच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या हाइड्रोक्सीयूरिया सस्पेंशन या औषधाची निर्मिती आणि वितरण करण्याचा निर्णय केला आहे.हे योगदान म्हणजे ऐतिहासीक मैलाचा दगड आहे कारण ही पहिलीच वेळ आहे की जागतिक स्तरावर या अतिआवश्यक औषधाची निर्मिती केली जाणार आहे. 2047 पर्यंत देशात सिकलसेल रोगाचे उच्चाटन करण्याच्या भारत सरकारचा निर्धार आहे. त्या अनुषंगाने, हे योगदान आरोग्याच्या या गंभीर आव्हानाचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी अकुम्सची वचनबद्धता अधोरेखित करते. सिकलसेल रोग ही भारतातील सार्वजनिक आरोग्याची प्रमुख चिंता आहे, दरवर्षी 2 लाखांहून अधिक बालके या आजारासह जन्माला येतात. दुर्दैवाने, यापैकी 20% बालके जगू शकत नाहीत आणि अतिरिक्त 30% त्यांच्या बालपणापर्यंत पोहोचत नाहीत. या महत्वपूर्ण योगदानाची औपचारिक घोषणा करतेवेळी संजीव जैन (सहसंस्थापक आणि संचालक), डी.सी. जैन (सहसंस्थापक),



आणि मिलिंद बी. पल्हाडे (HAL) यांच्यासह अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड चे प्रमुख व्यक्ती उपस्थित होते. या सहकार्याबद्दल उत्साह व्यक्त करताना, अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड चे सह-संस्थापक आणि संचालक संजीव जैन म्हणाले, "हिंदुस्तान अँटिबायोटिक्स लिमिटेड सोबतची आमची भागीदारी सिकलसेल रोगासारख्या गंभीर आरोग्य समस्या सोडवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.हाइड्रोक्सीयूरिया या औषधाची निर्मिती करून सिकल सेल या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टात महत्वपूर्ण योगदान देण्याचे आमचे ध्येय आहे. सिकलसेल रोग,हिमोग्लोबिनवर परिणाम करणारा अनुवांशिक विकार आहे जो भारताच्या मानवी आरोग्यावर लक्षणीय परिणाम करतो. अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड आणि हिंदुस्तान अँटिबायोटिक्स लिमिटेड यांच्यातील सहकार्य हे देशाला प्रभावी उपाय योजना आणि वैद्यकीय कौशल्याचा लाभ प्रदान करण्याची सामायिक वचनबद्धता प्रतिबिंबित करते. अशा गुंतागुंतीच्या आरोग्यविषयक आव्हानांचा सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या सहयोगी प्रयत्नांवर भर देत हिंदुस्तान अँटिबायोटिक्स लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती नीरजा सराफ म्हणाल्या आमची भागीदारी ही सिकलसेल रोगाचा सामना करण्याच्या सरकारच्या उपक्रमाला थेट सहकार्य करण्यासाठी आहे. एकमेकांच्या सहयोगाने अत्यावश्यक औषध उपलब्ध करून देऊन या आजाराने प्रभावित झालेल्यांच्या जीवनावर ठोस प्रभाव पाडण्याची आमची महत्वाकांक्षा आहे. सरकारी उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी आणि गंभीर आजारांच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आमचे हे सहकार्य फार्मास्युटिकल उद्योगाच्या समर्पणाचा पुरावा आहे. सिकलसेल रोगासाठी हायड्रॉक्सीयुरिया सस्पेंशन तयार करणे हे अकुम्ससाठी केवळ व्यावसायिक धोरण नसून सार्वजनिक आरोग्य आणि राष्ट्रीय आरोग्य सेवा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान देण्यासाठी हे एक धोरणात्मक पाऊल आहे.

सिकलसेल रोग ही दीर्घकाळापासून एक मूक महामारी बनली आहे जी अप्रत्यक्षरित्या समाजातील दुर्बल घटकांना प्रभावित करते. अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड आणि हिंदुस्तान एंटीबायोटिक्स लिमिटेड यांचे संयुक्त प्रयत्न आरोग्य सेवेतील दरी भरून काढण्यासाठी आणि सिकलसेल रोगाने बाधित लोकांना जीवनरक्षक औषधे मिळतील याची खात्री करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड हे सिकलसेल रोगाशी संबंधित मृत्यूचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करणे आणि प्रभावित झालेल्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यात योगदान देणे या ध्येपूर्तीसाठी HYDROXYUREA SUSPENSION ची निर्मिती करत आहे.त्यांच्या या योगदानामुळे भारतात दरवर्षी सिकलसेल आजाराने जन्मलेल्या 2 लाखांहून अधिक मुलांच्या आरोग्याला नवसांजिवनी मिळेल.

# माजी खासदार प्रतापदादा सोनवणे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** भाजपचे ज्येष्ठ नेते, धुळे लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार प्रतापदादा नारायण सोनवणे यांचे शुक्रवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा व नातवंडे असा परिवार आहे. शुक्रवारी प्रताप दादांचा ७५ वा वाढदिवस होता. त्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली. प्रतापदादा जनसंघाचे जुने कार्यकर्ते होते. त्यांना नाशिक महानगरपालिकेची उमेदवारी देण्यात आली होती. मात्र त्यात पराभूत झालेल्या प्रतापदादांनी नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघातून सलग दोन वेळा विजय मिळवला. मतदारसंघ पूर्नरचनेत धुळे हा नवीन लोकसभा मतदारसंघ अस्तित्वात आला. या मतदारसंघातून २००९ मध्ये पहिल्यांदा ते विजयी झाले.

# गुरु श्री तेगबहादुरजी महाराज यांचा शहिदी गुरुपुरब श्रद्धेने साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** समस्त मानव जातीला त्यागाची शिकवण देणारे शिखांचे नववे गुरु धन धन श्री तेगबहादरजी महाराज यांचा शहीदी गुरुपुरब श्रद्धा आणि प्रेमाने साजरा करण्यात आला. श्री गुरु तेगबहादर महाराज यांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी देश आणि मानवतेसाठी आपले शीश बलिदान दिले. दिल्लीतील चांदनी चौकात आजही गुरुद्वारा शीश गंज साहेब सुशोभित आहे. या निमित्त हजुरी साधसंगत व गुरु का खालसा संस्थेचे वतीने श्री सुखमणी साहेबजींचे पाठ व कथेचे आयोजन स्थानिक गुरुद्वारामध्ये करण्यात आले. हा कार्यक्रम जत्थेदार संतबाबा कुलवंतसिंघजी आणि पंजप्यारे साहेब तसेच गुरुद्वारा बोर्ड



अधीक्षक थान सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यातून संपन्न झाला.

गुरु का खालचा संस्थेचे अध्यक्ष कश्मीर सिंघ भट्टी यांच्या वतीने पाच दिवस हा कार्यक्रम झाला. ज्ञानी सरबजीत सिंगजी निर्मले आणि ग्यानी मनजीत सिंगजी गुरुद्वारा लंगर साहिब यांनी पाच दिवस कथा सादर केली. यानिमित लंगर प्रसादाचेही वाटप करण्यात आले. यावेळी हजुरी साध संगत तसेच संस्थेचे (अध्यक्ष) कश्मीर सिंघ भट्टी, प्रगत सिंघ जामदार, जसबीर सिंघ चड्डा, राजेंद्र सिंघ सिद्धू, प्रीतम सिंघ हरियाणा, बलजीत सिंघ खालसा, महेंद्र सिंघ रामगडीया, हरप्रीत सिंघ रामगढ़िया, सुखदेव सिंघ भट्टी हंसराज सिंघ लांगरी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# साहित्याची अभिरुची ही बालकुमार काळात रुजली पाहिजे : डॉ.लीला शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मराठवाडा साहित्य परिषद शाखा पैठण, आणि विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान पैठण, यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा साहित्य परिषदेचे पहिले मराठवाडा बालकुमार साहित्य संमेलन 12 जानेवारी 2024, शुक्रवार रोजी माहेश्वरी धर्मशाळा, उद्यान रोड, पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या बोधचिन्हाचे विमोचन प्रसिद्ध बाल साहित्यिक लिला शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. साहित्याची अभिरुची ही बालकुमार काळात रुजली पाहिजे, असे मत सौ.शिंदे यांनी व्यक्त केले. लहान मुलांतील निरागसता जपण्यासाठी आणि वाचन संस्कृती वाढविण्यासाठी कुमार वयात साहित्य



वाचले गेले पाहिजे. त्यासाठी हे साहित्य संमेलन मैलाचा दगड ठरेल, असे ही त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.ऋषिकेश कांबळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रासताविक डॉ. ऊर्मिला चाकूरकर यांनी केले तर सूत्रसंचालन मसाप पैठण शाखाध्यक्ष अनिल देशमुख यांनी केले. यावेळी स्वागताध्यक्ष संतोष तांबे, संयोजक प्रा. संतोष गव्हाणे, सुनिल चितळे, प्राचार्य संदीप काळे, नारायण औटे, साहित्यिक प्रशांत गौतम आदींची उपस्थिती होती. पैठण येथे होणाऱ्या एक दिवसीय मराठवाडा स्तरीय बालकुमार साहित्य संमेलनात सहावी ते बारावीच्या अभ्यासक्रमातील अनेक मान्यवर कवी, लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला येणार आहेत.सरदार जाधव यांनी आपल्या कुंचल्यातून बाल साहित्य संमेलनाला संयुक्तिक आणि अर्थपूर्ण बोधचिन्ह बनवलेले आहे, असे सांगताना हे संमेलन यशस्वी पार पडेल असा विश्वासही लिला शिंदे यांनी व्यक्त केला.12 जानेवारी 2024 रोजी सकाळी 8 ते 9 चित्र प्रदर्शन आणि पुस्तक दालनाचे उद्घाटन होईल. 9.30 ते 11.30 वाजेपर्यंत मुख्य उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. दुपारी 12 ते 1.30 वाजेपर्यंत बालसाहित्यिक आहे पण वाचक कुठे? हा परिसंवाद होणार आहे. दुपारी 1.30 ते 2.30 या वेळेत स्थानिकांची अभिव्यक्ती हा एक शाळा, एक कवी कार्यक्रम संपन्न होईल. दुपारी 2.30 ते 4 या वेळेत कथाकथन तर सायंकाळी 4 ते 6 कविसंमेलन सत्र असेल. सायंकाळी 6 ते 7.30 समरोप सत्र आणि रात्री 8 ते 10 सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होईल. ख्यातकीर्त बाल साहित्यिक डॉ सुरेश सावंत,नांदेड हे या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष आहेत. तर प्रसिद्ध समाजसेवक दिपक नागरगोजे, शांतीवन, आर्वी जिल्हा शिरूर यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न होत आहे.

# समतोल प्रकल्पचे प्रदीप पाटील यांचा प्रामाणिकपणा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथील केशवस्मृति प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्प व्यवस्थापक श्री. प्रदिप पाटील यांनी एका पाकीटाट सापडलेले अकराशे रू. आधारकार्ड व अन्य महत्त्वाची कागदपत्रे प्रामाणिकपणे संबंधित व्यक्तीपर्यंत पोहचवून परत केली. कानळदा जठा धारी मंदिर येथे सुरू असलेल्या पूज्य पंडित प्रदिप मिश्रा यांच्या शिव महापुराण कथेत श्री प्रदिप पाटील सेवा देण्याचे कार्य बजावत होते. त्यावेळी त्यांना दिनांक १० डिसेंबर २०२३ रोजी त्या गर्दीत दोन पाकीट सापडले. एक पाकीट त्याच ठिकाणी परत केले , पण एका पाकिटाचा शोध लागत नव्हता , त्यात अकराशे रू रोकड , कागदपत्रे ,



आढळले . त्यात आधारकार्ड होते , त्यावरून समजले की पिंपळकोठा , चांदसर येथील मिरा बाई चव्हाण यांचे हे पॉकेट आहे. यांची माहिती काढून प्रदिप पाटील यांनी आज दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी ते पॉकेट व्यवस्थित रित्या प्रामाणिकपणे त्यांना सुपूर्द केले. याच कथेत यांनी ६ मुलांना ही त्यांचा हरविलेला परिवार मिळवून देण्यात यश आले आहे. यांचा प्रामाणिकपणेचा नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# मुबलक असूनही दिवसाआड पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत अमरावती शहराचा ९८५.४९ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या प्रकल्पाला केंद्र सरकारच्या मान्यतेची प्रतीक्षा आहे. पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असूनही दिवसाआड पाणी, कमी दाबाचा पाणी पुरवठा, नळ जोडण्यांची संथगती यामुळे अमरावतीकर त्रस्त आहेत.

अमरावती पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर अमरावती महापालिकेने सादर केला होता. या प्रकल्पाची मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने केंद्र सरकारच्या शिखर समितीकडे शिफारस केली आहे. आता केंद्र सरकारच्या अंतिम मंजुरीनंतरच या प्रकल्पाचे काम पुढे सरकू शकेल. अमरावती शहराला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. अमरावतीकरांची तहान भागेल इतका पाणीसाठा धरणात उपलब्ध आहे. तरी अमरावतीकरांना अपुऱ्या व अर्धवट पाणी पुरवठ्याची झळ सहन करावी लागत आहे. अप्पर वर्धा धरण मोर्शी ते नेरपिंगळाई पर्यंतची डब्लूटीपी जलवाहिनी जुनी लोखंडी असून शिकस्त झाली असून जलवाहिनी फुटली तर अमरावतीचा पाणी पुरवठा चार ते पाच दिवस बंद राहतो असे चित्र आहे. त्यामुळे नजीकच्या गावांना सुद्धा पाणी पुरवठा होत नाही. ही गैरसोय टाळण्यासाठी अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना अमृत २.० अभियाना अंतर्गत सिंभोरा हेडवर्क्स ते नेरपिंगळाई संतुलन टाकी पासून पुढे तपोवन जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत मृदू पोलादी जलवाहिनी अंथरण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता.

# आ.विजय भांबळे यांच्या उपस्थितीत युवकांचा रा. काँग्रेसमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरातील नवयुवकांचा मा.आ.विजय भांबळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत जनसंपर्क कार्यलय, येलदरी रोड जिंतूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करण्यात आला. त्यात शहरातील झाकीर शेख, असेफ पठाण, एस.के. मौजुद, अब्दुल रझाक, मोसिन खान, शोएब शेख, सय्यद साजिद, सय्यद परवेज, महेफुज देशमुख, आयान शेख, मुखिद पठाण, नविद शेख,शेख नदीम ई. नी भाजपची ध्येय धोरणे व जिंतूर येथील अकार्यक्षम नेतृत्व यांना कंटाळून मा.आ.विजयराव भांबळे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला यावेळी मा.आ.विजयराव भांबळे यांनी सर्वांचे हार व पक्षाचा रुमाल घालून पक्षात स्वागत केले व पुढील निवडणुकीसाठी सर्व ताकतीने कामास लागून मा.ना.शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार व विकास तळागळापर्यंत पोहचवण्याचा सल्ला दिला. यावेळी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# खासदारांचे निलंबन ताबडतोब मागे घ्या


आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** महाराष्ट्र काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार व बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या सूचनेनुसार दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी व शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष शेख समद शेख यांच्या नेतृत्वात लोणार तहसीलदार गिरीश जोशी यांच्या माध्यमातून मा. माहीम राष्ट्रपती मॅडम यांना निवेदन देण्यात आले.

भारतीय संसद ही देशाची सर्वोच्च संस्था आहे. हिवाळी अधिवेशन सुरू असताना संसद भवनाची सुरक्षाभेदून दोन तरुणांनी लोकसभेमध्ये स्मोक हल्ला केला. ही घटना राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय गंभीर स्वरूपाची असल्याने या संदर्भात केंद्रीय गृहमंत्री यांनी केंद्र शासनाच्या भुमिकेसंदर्भात निवेदन करावे, अशी मागणी करणाऱ्या विरोधी पक्षातील १४२ खासदारांचे भाजप सरकारने निलंबन केले आहे. हा लोकशाही वरील हल्ला असून केंद्रातील भाजप सरकार धक्कादायक पणे विरोधी पक्षाच्या १४२ खासदारांना संसदेच्या दोन्ही सभागृहातून बाहेर काढते, ही एक प्रकारे लोकशाही तत्त्वांची नग्न हत्या आहे.

याचा निषेध करत निलंबित खासदारांचे निलंबन तात्काळ मागे घेण्यात यावे त्या अनुषंगाने आज लोणार महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदार लोणार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद,महाराष्ट्र प्रदेश सेवा दलाचे प्रकाश धुमाळ, ज्येष्ठ नेते साहेबराव पाटोळे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शांतीलाल गुगलीया, उपनगराध्यक्ष बादशाह खान,गटनेते भूषण मापारी, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी,अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तौफिक कुरेशी, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख ॲड. दिपक मापारी, माजी प.स.सभापती ज्ञानेश्वर चिभडे, माजी शहराध्यक्ष नितीन शिंदे, मेहकर विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष भरत राठोड,ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, माजी नगरसेवक पंढरी चाटे,माजी नगरसेवक शेख करामत,रामचंद्र कोचर,युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष अमोल सोनुने, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष विकास मोरे,आप्पा शिंदे, मोहसीन शहा,पांडुरंग घुगे, राठोड,महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षातील नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.



# बाजारात गोळीबार एक तरुण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील पानवाडी येथे गोळीबार झाल्याची घटना घडली. पानेवाडी येथे गुरुवारी आठवडी बाजार असतो या बाजारात आरोपी गावठी पिस्तूल दाखवून दहशत निर्माण करत असल्याचे तेथील नागरिकांनी सांगितले. यानंतर आरोपी कुमार भानुदास शिंदे यांने ३ वाजेच्या सुमारास एका तरुणावर गोळी झाडल्या ची घटना घडली. जखमी तरुणांचे नाव अमोल पांडुरंग शिंदे ( वय 35 ) असुन याला पोटात गोळी लागल्याने जालना येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ज्यावेळेस ही घटना घडली तेव्हा हा आरोपी बस स्टँडच्या दिशेने धाव घेत होता. त्या ठिकाणातील नागरिकांनी त्याला चोप देऊन एका झाडाला बांधून ठेवल्याचे प्रथम दर्शनी माहिती मिळाली. या नंतर घनसांगी पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीला आपल्या ताब्यात घेतले असून त्याच्याजवळ एक गावठी पिस्तूल व एक जिवंत काढतुस मिळाल्याचे कळते. अद्याप गोळीबार करण्याचं कारण स्पष्ट झालेलं नाही. आरोपी कुमार शिंदे हा बऱ्याच दिवसांनी गावठी पिस्तूल घेऊन तेथील भागात आपली दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगितले जात आहे.जालना जिल्ह्यात गोळीबाराच्या घटना वाढत चाललेल्या आहे काही दिवसांपूर्वीच गजू भाऊ तौर या तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. यामुळे पोलिसांनी सतर्क राहून कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

# धुळे स्थानिक गुन्हे शाखेने पकडला लाखोंचा गुटखा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** परराज्यातुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा पानमसाल्याची विक्री करण्याच्या उद्देशाने तस्करी होत असल्याने मा. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, धुळे यांनी पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना सुचना देऊन कारवाई करणे बाबत आदेशीत केले होते. सदर आदेशानुसार माहिती प्राप्त करीत असतांना दिनांक २१ रोजी पो.निरी.श्री. दत्तात्रय शिंदे, स्थागुशा धुळे यांना गुप्तबातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, कंटेनर मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा पानमसाला भरलेला असुन सदर कंटनेर वाहन शिरपुर कडुन धुळे कडे येत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने मा. पोलीस निरीक्षक, स्थागुशा, धुळे यांनी लागलीच पथकास नमुद बातमीची खात्री करुन पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई कामी आदेशीत केले. त्याअनुषंगाने पथक सदर कंटेनर वाहनाचा शोध घेत असतांना सोनगीर टोल नाक्याजवळील हॉटेल सत्यम समोर सदर कंटेनर बाहन क्रमांक एच. आर. ३८ ओ.सी. ०४२२ हे थांबलेले दिसल्याने कंटेनर वाहनाजवळ जावुन चालकास त्याचे नाव गाव विचारता असता त्याने त्याचे नाव नरेशकुमार घनश्यामसिंग चौधरी वय ४२ वर्ष चंदा चालक रा. मुरसाना, सहकारी नगर, जिला बुलंदशहर, उत्तरप्रदेश असे सांगितले. चालकास कंटनेर मधील मालाबाबत विचारपुस करता, त्याने उडवा-उडवीचे उत्तरे दिल्याने त्यास कंटेनर वाहनासह पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे मागील आवारात आणले. सदर कंटनेरची तपासणी करता त्यात ५६,२५,९००/- रु.कि.चा शिखर पानमसाला,८,८२,०००/- रु.कि.चा SS-ONE TOBACCO तंबाखू,२०,००,०००/- रु.कि.चा कंटेनर क्रमांक एच.आर.३८ ओ.सी. ०४२२ असा एकुण ८५,०७,९००/- रु. किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला शिखर पानमसाला व SS-ONE TOBACCO बैंगलोर शहरात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करतांना मिळून आल्याने त्यांचे विरुध्द सोनगीर पोलीस ठाणे येथे भाग ५ गुरनं. ३८०/२०२३ भादंवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे. सदरची कारवाई श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, धुळे, श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. चे पो.निरी.श्री. दत्तात्रय शिंदे, सपोनि गणेश फड, असई/श्याम निकम संजय पाटील, पोहेकों/संदीप सरग, प्रकाश सोनार, हेमंत बोरसे, मच्छिद्र पाटील, संतोष हिरे, संदीप पाटील, अशोक पाटील, प्रल्हाद वाघ, तुषार सुर्यवंशी, सुरेश भालेराव, राहुल गिरी, कमलेश सुर्यवंशी, जितेंद्र वाघ, जगदीश सुर्यवंशी, महेंद्र सपकाळ गुणवंत पाटील अशांनी केली आहे.




# सावंगीत श्रीमद भगवद्गीता जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील रायझिंग इंग्लिश स्कूल मध्ये श्रीमद भागवद गिता जयंती साजरी करण्यात आली. धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः। मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय॥

आज दि २२ रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज मध्ये श्रीमदभगवद गीता जयंती साजरी करण्यात आली त्या प्रसंगी श्रीमदभगवद गीतेचे जीवनातील महत्त्व व अध्यात्म व विज्ञान याचा सहसंबंध कसा आहे हे प्राचार्य योगेश इंगळे सर यांनी गीतेच्या ( ज्ञानेश्वरी )ओव्यातून समजावून सांगितले त्या प्रसंगी श्रीमदभगवद गीतेचे पूजन करण्यात आले तसेच गीतेचा पंधरावा अध्याय विद्यार्थी व शिक्षक यांनी पठण केला त्या प्रसंगी मुख्याध्यापक.प्रा. विश्वंभर नलावडे सर प्रा.इंगळे सर प्रा.भोपळे सर, वेताळ सर, गाडेकर सर, श्रीमती नलावडे मिस, शेळके मिस, मनीषा गायकवाड मिस, आत्तार मिस, खूटे मिस ,गायकवाड मिस, धीरज पवार यांनी पूजन केले.



# काळम्मावाडी नळ पाणी योजनेला पुन्हा गळती

आधुनिक केसरी न्यूज

कोल्हापूर : कोल्हापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी जीवनदायिनी ठरलेल्या काळम्मावाडी योजनेला बुधवारी पुन्हा एकदा गळती लागली. तुरुंबे ते कपिलेश्वर या रस्त्यावर गळती लागल्याने लाखो लिटर पाणी वाहून गेले. यापूर्वी नोव्हेंबर महिन्यात गळतीचा उपद्रव झाला होता. कोल्हापूर शहराच्या शुद्ध व मुबलक पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी काळम्मावाडी धरणातून नळ पाणी योजना राबविण्यात आली. या योजनेला गळतीचे प्रकार घडू लागले आहेत. नोव्हेंबरच्या मध्यास हळदी ते कुर्डू या गावच्या दरम्यान जलवाहिनीला गळती लागली होती. चार ठिकाणी एअर व्हॉल्वला लावलेले नट बोल्ट काढले होते. यामुळे पाण्याचे फवारे ५० ते ६० फूट उंच उडत होते. मोठ्या प्रयत्नानंतर ही गळती थांबवण्यात आली होती. दरम्यान आज पुन्हा या जलवाहिनीला गळती लागल्याचा प्रकार निदर्शनास आला. तुरुंबे ते कपिलेश्वर या रस्त्यावर गळती दिसून आली. शेतालगत पाणी वाहून जात होते. आजूबाजूच्या शेतात पाणी घुसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. कोल्हापूर महापालिकेच्य पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. त्यांनी गळती थांबवण्याचे काम गतीने सुरू केले होते.



# महापौर ताई शेवटच्या दहा दिवसांत एक महासभा; गेल्या पाच वर्षात विकास कामांमधील झालेल्या भ्रष्टाचारावर व टक्केवारीवरही घ्या

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** अत्यंत कमी कालावधीसाठी आपण धुळे शहराच्या महापौर म्हणून सरतेशेवटी धुळे महानगरपालिकेचे कामकाज पाहिले. सभागृहातील जेष्ठ महिला सदस्या, आक्रमक, विषयाला तडीस नेणे, शहर विकासासंदर्भात विविध विषयात अभ्यासपूर्ण मुद्दे मांडणे, महापौर पदाच्या अल्प कालावधीत आपण अनेक धाडसी निर्णय घेतले व विरोधकांना देखील तोडीस तोड उत्तरे दिलीत. पण गेल्या चार वर्ष अकरा महिने आणि 21 दिवसात धुळे महानगरपालिकेच्या बोटावर मोजण्या इतक्या महासभा झाल्यात, असा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच संपूर्ण मनपाचा साडेचार वर्षांचा कालावधी महापौरांऐवजी भाजपाच्या माजी शहर जिल्हाध्यक्षांनी मनपाचा कारभार महापौरांच्या बाजुला खर्ची टाकून बेकायदेशीरपणे मनपा प्रशासनाच्या निर्णयात ढळाढवळ करुन चालविला. धुळे शहरात गेल्या साडेचार वर्षात महापौरांऐवजी भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष यांचेच नाव शॅडो महापौर म्हणून चर्चेत राहिले या साडेचार वर्षात अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे गाजली आणि दडपलीही गेली. गेल्या साडेचार वर्षात धुळेकरांच्या मनातील अनेक प्रश्न जसेच्या तसे राहिले त्याचप्रकारे असे प्रश्न त्यांच्यासमोर मांडण्यात आले

1) धुळेकरांना दररोज पाणी पुरवठा करु या प्रश्नावर ?
2) पाणी पुरवठा योजना पूर्ण न झाल्याबद्दल ?
3) अमृत योजनेतील अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना अद्यापही पूर्णतः कार्यान्वीत झाल्याबद्दल?
4) अमृत मलनिःसारण योजनेतील झालेल्या भ्रष्टाचार व अपूर्ण निकृष्ट दर्जाचे असलेले काम ?
5) पाणी पुरवठा योजनेअंतर्गत 9 जलकुंभ उद्घाटनाअभावी कोरडेठाक पडून असल्याबद्दल ?
6) कचरा डेपोचे आयुष्य संपले तरी कचरा डेपोसाठी नवीन स्थान निर्धारण न झाल्याबद्दल ?
7) खाऊ गल्ली, टॉवर बगीचा, नदी काठावरील नवीन गार्डन, बांबु घोटाळा यात झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल ?
8) सतरा कोटी रुपये खर्चून एलईडी पथदिवे अद्यापही पूर्ण शहरात न लागणे. बंद व नवीन पथदिवे शहरात लागत नसल्याबद्दल व अर्धे अधिक शहर रात्री अंधारात असल्याबाबत?
9) आस्था ठेकेदार, स्वयंभू ठेकेदार, मनपाच्या कोटयावधीच्या जागा घशात घालणाऱ्या भूमाफिया. देवपुरातील भाजी मंडई आरक्षित जमीनीचे जागेत दस्ताऐवजात गरबड करणाऱ्यांवर अद्याप गुन्हे दाखल झाले नाहीत, यावर ?
10) बीओटी तत्वावरील ग.नं. 6 येथील पाटील कॉम्प्लेक्स, मालेगांव रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या शेजारील कॉम्प्लेक्स भाडेप्रश्न व परस्पर गाळे हस्तांतरण यावर संबंधीत ठेकेदार बोरसेवर गुन्हे का दाखल केले नाहीत, याबाबत ?
11) राजर्षी शाहू महाराज नाट्यमंदिर, स्नेहनगर जलतरण तलाव यात ठेकेदारांनी चालविलेल्या मनमानी विरोधात सांगूनही कार्यवाही न झाल्याबद्दल ?
12) मालमत्ता कर व पाणी पुरवठा करात कुठलाही ठराव न करता करण्यात आलेल्या मनमानी करवाढी संदर्भात ?
13) नगरउत्थान योजनेतील रस्ते, गटारी, पथदिवे, संरक्षणभिंती, ओपन स्पेस, बगीचे यात झालेल्या निकृष्ट कामांची चौकशी करुन ठेकेदारांवर कारवाई संदर्भात ?
14) गेल्या 4 वर्ष 11 महिने 21 दिवसात झालेल्या कोटयावधी विकास कामाचे ऑडीट करणे व यात झालेल्या भ्रष्टाचार व खाल्लेल्या टक्केवारीवर ?
15) महानगरपालिकेचे विशेष लेखा परिक्षण करणे. कर्मचारी व शिक्षक यांचा सातव्या वेतन आयोगाचा फरक आस्थापना व प्रशासनातील सुस्ष्टता आणणे या विषयावर आणि अजुन बरेच काही अनुत्तरीत राहिलेल्या विषयांवर एक कर्तव्यदक्ष महापौर म्हणून आपण एक महासभा सरतेशेवटी घ्यावी असे आवाहन आम्ही आपणास करीत आहोत. धुळे महानगरपालिकेमध्ये गेल्या महिनाभरापासून मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारचे ठराव करण्यात येत आहेत. हे सर्व मोठ्या घाईघाईने केले जात असल्याचे आमच्या निदर्शनास येत आहे. लोकप्रतिनिधींनी विचार करुन सर्व बाबी करणे आवश्यक असते. हा सभेचा शेवटचा आहे.

यापूर्वी जितके ठराव झालेले नाहीत तेवढे ठराव या महिन्यामध्ये होत असल्याचे निदर्शनास येत आहे. एकापाठोपाठ एक महासभा घेतल्या जात आहेत. सदर विषय प्रशासनाकडून येत आहेत किंवा नाहीत याबाबत देखील कोणतीही माहिती जनतेला होत नाही. प्रशासनाकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात शेवटच्या महिन्यांमध्ये विषय येण्याचे कारण समजून येत नाही. मागील 4 वर्ष 11 महिने प्रशासन झोपले होते का ? की ते कायदेशीरपणे परस्पर महासभेचे ठराव करण्याचे काम चालु आहे ? हे समजुन येत नाही. तरी या महासभांमध्ये कोणतेही बेकायदेशीर काम झाल्यास किंवा महापालिकेचे नुकसान झाल्यास यास सर्वस्वी आपण जबाबदार राहाल याची आपण नोंद घ्यावी असे या निवेदनात सांगण्यात आले. सभाच घ्यायची झाल्यास आम्ही विचारलेल्या प्रश्नांवर धुळेकरांच्या मुलभूत सुविधांसाठी घ्यावी अशा आशयाचे निवेदन महापौर प्रतिभा चौधरी यांना शिवसेना उ. बा. ठा. तीने देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे मा. आ.प्रा. शरद पाटील किरण जोंधळे, धीरज पाटील डॉ. सुशील महाजन, भरत मोरे, मच्छिंद्र निकम, प्रफुल्ल पाटील, सुनील पाटील, संदीप सूर्यवंशी, कैलास मराठे, छोटू माळी, शिवाजी शिरसाळे, अमजद पठाण, भटु गवळी, दिनेश पाटील,अजय चौधरी, नितीन जडे सोनार, कैलास कांजरेकर, सलिम खान, नासिर पिंजारी, अमोल ठाकूर, अनिल शिरसाट, तेजस सपकाळ आदी उपस्थित होते.

## निरेत आज रक्तदान शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रक्तदान हेच श्रेष्ठदान मानले जाते.मानवाच्या



आरोग्याच्या दृष्टीने एखाद्या व्यक्तीला रक्ताची आवश्यकता भासत असते.तेव्हा त्या व्यक्तीचा जीव वाचविण्यासाठी आपल्याकडे रक्ताचा साठा असणे खूप गरजेचे असते.त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपत अनेक ठिकाणी एखादे औचित्य साधून रक्तदान शिबिरे भरविली जात असतात. थेंब आहे हा रक्ताचा,आधार आहे दुसऱ्यांच्या जीवनाचा या वाक्याप्रमाणे

निरा ता.पुरंदर येथे माजी जलसंपदा,जनसंधारण राज्यमंत्री व शिवसेना पक्षाचे उपनेते विजयबापू शिवतारे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवार दिनांक २३ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.अशी माहिती श्री स्वामी समर्थ दूध संकलन केंद्राचे संस्थापक अध्यक्ष पै.गणेशकाका गडदरे यांनी दिली.सकाळी ठीक ९ वाजता ॲसेंड इंटरनॅशनल स्कूल,कृषी उत्पन्न बाजार समिती,मार्केट यार्ड येथे रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

रक्तदान शिबिराच्या उदघाटक महिला आघाडी शिवसेनेच्या पुणे जिल्हा प्रमुख ममताताई शिवतारे-लांडे ह्या असणार आहेत. प्रमुख म्हणून म्हणून युवा सेनेचे पुणे जिल्हा प्रमुख दिलीपआबा यादव असणार आहेत.तसेच इतर मान्यवर म्हणून पुणे जिल्हा शिवसेना समन्वयक उमेश गायकवाड,पुणे जिल्हा युवा सेना प्रमुख तुषार हंबीर,तालुका प्रमुख शिवसेना पुरंदर हरिभाऊ लोळे,तालुका प्रमुख महिला आघाडी वैशालीताई काळे,तालुका प्रमुख युवा सेवा पुरंदर नितीन कुंजीर,सचिव पुरंदर हवेली शिवसेना प्रवीण लोळे,पुणे उपजिल्हाप्रमुख युवासेना सागर मोकाशी,तालूका प्रमुख विद्यार्थी सेना अवि बडदे,कार्याध्यक्ष युवासेना पुरंदर मंगेश भिंताडे आदी उपस्थित राहणार आहेत.या रक्तदान शिबिरास उपस्थित राहून रक्तदात्यांनी रक्तदान करावे. असे आवाहन पै.गणेशकाका गडदरे यांनी केलेले आहे.

## दंडात्मक कारवाईच्या आश्वासननंतर उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलीभंजन-व-नंद्राबाद येथे होत असलेल्या मातीचे अवैध उत्खनन, विना परवानगी विटभटट्या त्याचे प्रदुषण या संदर्भात तहसील कार्यालय खुलताबाद येथे बे मुददत उपोषण सुरु करण्यात आले होते. याची चौकशी तथा दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. महसुल विभागाने दंडात्मक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले आहे.तालुक्यातील सुलीभंजन नंद्राबाद परिसरात गट क्रमांक ४३ येथून अवैध रित्या माती उत्खनन विना परवानगी विटभटट्या व परिसरात त्याचे प्रदुषण या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते विरेंद्र वाघ व उपसरपंच सुनील



घुसळे यांनी तहसील कार्यालय समोर चौकशी व दंडात्मक कारवाई साठी बे मुददत उपोषण सुरू केले होते याची दखल तहसील प्रशासनाने घेतली व दंडात्मक कारवाई करण्याचे आश्वासन दिले त्यावरुन उपोषण मागे घेतले.

## शेलुखडसे येथील कु. अनन्या खडसेची भरारी

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे या गावातील कु. अनन्या तुषार खडसे हिने अमरावती येथे पार पडलेल्या प्रो एक्टीव्ह नॅशनल स्पर्धेत



विदर्भातून गुणानुक्रमे अव्वल स्थान पटकावत उंच भरारी घेतली आहे. अनन्या खडसे ही शेलुखडसे येथील प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ते श्री विश्वासराव खडसे यांची नात आहे. अमरावती येथे पार पडलेल्या या स्पर्धेत संपुर्ण विदर्भातून हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. सदर स्पर्धेत मेहकर येथील मॅथ मॅजिशियनच्या विद्यार्थ्यांनी देखील सहभाग घेतला होता. त्यामध्ये समर्थ अजय शेवाळे आणि कु. अनन्या तुषार खडसे यांनी लेवल मधे फर्स्ट येत अव्वल स्थान पटकावले आहे.तर अनन्या खडसे हिने विदर्भातून दुसरा क्रमांक पटकावत उंच भरारी घेतली आहे. आपल्या गावाचे व शाळेचे नाव उज्वल करणाऱ्या या चिमुकल्यांनी मिळवलेल्या यशाचे श्रेय त्यांचे शिक्षक सौ. पल्लवी काळे मॅडम, आणि काळे सर यांना दिले आहे. अनन्या खडसे हिने मिळवलेल्या यशाबद्दल संपुर्ण ग्रामस्थ तीचे कौतुक करीत आहेत. या बाबत कु. अनन्या तुषार खडसे सोबत संपर्क साधला असता, तिने पुढच्या स्पर्धेत राज्यातून अव्वल स्थान पटकावण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.




## नवीन कौठा जि. प. शाळेस संविधान प्रत भेट

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नवीन कौठा परिसरातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत भारतीय संविधानाची प्रत भेट देण्यात येऊन 'शाळा तिथं संविधान' या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे आणि कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांच्याकडून मुख्याध्यापक रामदास कदम यांनी संविधानाची प्रत स्विकारली. यावेळी शाळेतील सहशिक्षक बालाजी बड्डू, बालाजी ठाकुर, कमल पैनापल्ले, प्रभावती राणे, नंदा कांबळे, भीम जयंती मंडळ नवीन कौठाचे पदाधिकारी मनोज जोगदंड, जळबा सोनकांबळे, योगेश भुतके, प्रदीप ससाणे, किरण चित्ते, विशाल गायकवाड यांची उपस्थिती होती. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने शाळा महाविद्यालयांना प्रत्येकी एक याप्रमाणे वर्षभरात संविधानाच्या ७५ प्रती वाटप करुन अमृत महोत्सव साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील नवीन कौठा परिसरातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेस संविधानाची एक प्रत भेट देण्यात आली. अनेक शाळा महाविद्यालयांच्या ग्रंथालयात संविधानाची प्रत नसल्याचे दिसून आले आहे. या निमित्ताने संविधानाची तोंडओळख व्हावी व संविधान साक्षरतेच्या दिशेने शिक्षक आणि विद्यार्थी प्रयत्न करतील. उर्वरित ज्या शाळा महाविद्यालयांमध्ये संविधान नाही त्यांनी भारतीय संविधानाची प्रत आपल्या ग्रंथालयात समाविष्ट करावी, असे आवाहन येथील साहित्यिक समीक्षक तथा मंडळाचे कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांनी यावेळी केले.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज,दहागाव विभाग, जासई. ता. उरण जि.रायगड. या विद्यालयात आपल्या ५९ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून कामगार नेते मधुकर पाटील( जे.एन.पी.ए.) यांच्याकडून सामाजिक जाणिवेतून गोर-गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दप्तरे, गणवेष, वही-पेन, शूज इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कामगार नेते सुरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा अभ्यासासाठी चांगला वापर करावा असे मनोगत व्यक्त केले.वाढदिवस मूर्ती मधुकर पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या विषयी त्यांच्या या सामाजिक कार्या बद्दल सुरेश पाटील यांनी गौरवोदगार काढले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य दशरथ भगत,सुधीर घर यांची विशेष उपस्थिती लाभली. विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग यांनी उपस्थित मान्यवरांचे विद्यालयामार्फत स्वागत करून देणगीदार मधुकर पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांचे शाळेच्या वतीने आभार मानले. संकल्प बिल्डर ग्रुपचे मालक श्री.जरे यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी २५ हजाराची मदत केली.या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, व्हाईस चेअरमन डी.आर. ठाकूर,ज्येष्ठ सदस्य नरेश घरत ,कामगार नेते रवी घरत, डी.आर. सोनवणे वाडकर तसेच नवी मुंबई पुनर्वसन समितीचे सचिव व दि.बा.पाटील चळवळ स्पर्धेचे प्रमुख संयोजक शैलेश घाग हे प्रमुख मान्यवर आणि विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# मका व्यापाऱ्यांची मनमानी थांबवा

## वंचित बहुजन आघाडीचा आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज



**येवला :** मका व्यापाऱ्याची मनमानी थांबवा अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा मा.मुख्य सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती येवला यांना निवेदनाद्वारे आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे. निवेदनाचा आशय असा, यावर्षी पाऊस अतिशय कमी झाल्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडलेला आहे. कधी कांदे भाव पडले तर कधी कांदे सडले, कधी गारपिट तर कधी दुष्काळ या सर्वांवर मात करीत बळीराजा आपल्या परिवाराला सांभाळण्यासाठी जीवाचा आटापिटा करत आहे. तालुक्यात दोन प्रामुख्याने पिके घेतले जातात कांदा व मका. परंतु पाऊस अतिशय कमी झाल्यामुळे मकाचे उत्पन्नात मोठी घट झालेली आहे असे असताना देखील येवल्यात मात्र व्यापारी व्यापाऱ्यांची मनमानी कारभार सुरू आहे. लिलाव चालू व बंद हे वेळेवर केले जात नाही. तास न तास शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागते. मकाला तोंड पाहून भाव ठरविला जातो व सर्व सामान्य शेतकऱ्यांची लूट ही सर्रासपणे केली जात आहे. मक्याचे पैसे वेळेवर भेटत नाही. शेतकऱ्यांना अरेरावेची भाषा वापरली जाते. विकलेल्या मका चे पैसे १५/१५ दिवस भेटत नाही. शेतकरी चकरा मारून थकून गेले हा सर्व प्रकार रासरोसपणे चालू असताना मार्केट कमिटी मात्र बघ्याची भूमिका घेते. म्हणून या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आम्ही आपणास लेखी निवेदन देऊन खालील मागण्या मागत आहोत. मकाचा लिलाव वेळेवर सुरू करत नाही त्यामुळे त्याचा टाईम टेबल जाहीर करावा, विकलेल्या मालाचे पैसे २४ तासात देणे बंधनकारक असताना देखील पंधरा-पंधरा दिवस पैसे दिले जात नाही म्हणून ती रक्कम रोख स्वरूपात देण्यात यावी, शेतकऱ्यांनी विकलेल्या मालाचे पैसे संदर्भात तक्रार निवारण कक्ष सुरू करावे करून तसेच जाहिरात करावी, मार्केट अचानक बंद न ठेवता २४ तास आधी जाहीर नोटीस बोर्डवर फलक सूचना लिहिण्यात यावी वरील मागण्या या शेतकरी हिताच्या आहेत, आपण तात्काळ दखल घेऊन आम्हाला लेखी स्वरूपात पत्र व्यवहार करावा अन्यथा पक्षाच्या वतीने महेंद्रभाऊ पगारे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल.

# 'सह्याद्री'त पुन्हा एकदा वाघांच्या पाऊलखुणा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** सह्याद्री व्याघ्र प्रकल्पमध्ये वाघाचे दर्शन झाल्याने या व्याघ्रप्रकल्पात वाघाच्या स्थलांतरणाचा मार्ग मोकळा झाल्याची चर्चा आहे. नुकतेच वन विभागास सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील जंगल परिसरात १२ डिसेंबरला वाघाच्या पायाचे ठसे मिळाले. ही बाब गस्ती करणाऱ्या वनरक्षक व वनमजूर याला लक्षात येताच त्यांनी तातडीने ही बाब वनक्षेत्रपाल यांना कळवली.

पुढे तीन दिवस वेगवेगळ्या ठिकाणी पायांचे ठसे व विष्टा सापडली. या जंगल परिसरातील वनविभागाने लावलेले कॅमेरा ट्रॅपची तपासणी केली असता दिनांक १७ डिसेंबरला पहाटे ४.५९ वाजता वाघाचे छायाचित्र कॅमेऱ्यात कैद झाले असल्याचे निदर्शनास आले. २०१४ मधील गणनेनुसार सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात तीन वाघ आढळल्याच्या नोंदी आहेत. सह्याद्री व्याघ्रप्रकल्पाचा भाग असलेल्या राधानगरी अभयारण्यात २३ एप्रिल २०२२ ला लावलेल्या कॅमेरा ट्रॅप मध्ये पूर्ण वाढ झालेल्या वाघांचे छायाचित्र आले होते.तर यापूर्वी २०२१ मध्ये त्याठिकाणी वाघाचे छायाचित्रण झाले होते. सह्याद्री व्याघ्रप्रकल्पात वाघ नाही. पण येथे वाघाचे अस्तित्व राहिले आहे. ते कायमस्वरुपी असावे यासाठी आता राज्याच्या वनखात्याने पावले उचलली आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधीकरणाने त्यावर शिक्कामोर्तब केले असून लवकरच या व्याघ्रप्रकल्पात पर्यटकांना व्याघ्रदर्शन होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील आठ वाघ सह्याद्री व्याघ्रप्रकल्पात सोडण्याची परवानगी वनखात्याने मागितल्यानंतर नुकतेच प्राधिकरणाने ही परवानगी दिली आहे. या प्रकल्पासाठी प्राधिकरणाकडून १०.५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.


# भोकर ते शिर्डी पदयात्रेत साईभक्ताचा सहभाग

## गणपत पीट्टेवाड यांचा उपक्रम : चौदा वर्षांची परंपरा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा ओबीसी मोर्चाचे ( ग्रामीण जिल्हा अध्यक्ष )गणपत पीठ्ठेवाड यांच्या वतीने दरवर्षी भोकर ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन केल जात. बूधवारी ( ता.२० ) शहरातून बहूसंख्य साईभक्तानी स्वयंस्फूर्तीने पदयात्रेत सहभाग घेतला.मागील चौदा वर्षांपासून भक्ताची मोफत सेवा केली जाते. या अनोख्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केलं जात आहे.

#साईलीला मित्र मंडळाच्या वतीने



शिर्डी पदयात्रा आणि वर्षभर हुंडाबळी, व्यसनमुक्ती, धार्मिक कार्यक्रम घेऊन समाजप्रबोधनाचे काम सुरू आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील ऊपेक्षीत घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सततचे प्रयत्न सुरू आहेत.विधायक कामास प्राधान्य देवून तळागाळातील माणसाला आधार दिला जात असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर वेगळा आनंद दिसून येत आहे.या शिवाय साईभक्ताना शिर्डीतील साईबाबाचे दर्शन घेणं सूलभ व्हाव म्हणून नित्यनेमाने दरवर्षी भोकर ते शिर्डी पदयात्रा काढली जाते. पदयात्रेत सहभागी झालेल्या भक्ताची मागील चौदा वर्षांपासून मोफत सेवा पूरवली जात आहे.पदयात्रेत साईनाथ राठोड,रमेश मटकमवाड, शेषराव बाभळीकर, गजानन राचुटकर,विजय प्रेमलवाड, श्याम पवार,सत्यम देवकर यासह बहूसंख्य साईभक्त सहभागी झाले आहेत.अशा अनोख्या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक केलं जात आहे.




# खडकमाळेगावकरांचे जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ उपोषण २० व्या दिवशीही सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ खडकमाळेगाव ता.निफाड येथील नागरिकांचे साखळी उपोषण २० व्या दिवशीही सुरूच असून उपोषणास ज्येष्ठ नागरिक, महिला, युवावर्ग, मुस्लिम तसेच ओबीसी बांधवांही सहभाग मिळत आहे. खडकमाळेगाव येथे मराठा आरक्षणासाठी सुरु असलेल्या साखळी उपोषण प्रसंगी मुस्लिम पंच बांधवांनी आरक्षण मिळेपर्यत मराठा समाज बांधवांबरोबर खांद्याला खांदा लाऊन आम्ही प्रत्यक्ष सहभागी होतो व आजही आरक्षण मिळेपर्यंत सहभागी राहणार असल्याचे पंच कमेटी अध्यक्ष दाऊद पठाण यांनी सांगितले. या उपोषणास कोळी बांधवानी देखील पाठिंबा दिला आहे. उपोषणास वसंत शिंदे, विकास रायते, सुरेश रायते, बाजीराव रायते, संपत शिंदे, भास्कर रायते, दिगंबर चव्हाण, श्रीराम रायते, शिवाजी शिंदे, भाऊसाहेब रायते आदी उपस्थित आहेत.

मराठा आरक्षणासाठी जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू असून त्यांचा पुढील आदेश येईपर्यंत राजकीय पुढारी यांना गावबंदी, ग्रामस्थांचे साखळी उपोषण सुरूच राहणार असून उपोषणास सर्व जातीधर्माच्या नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे .
- विकास रायते, आंदोलक

# झी मराठी निर्मित "जाऊबाई गावात" टीमकडून महिलांच्या खेळांना लाभला उदंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** खोपटे गावच्या माजी सरपंच भावना कैलास म्हात्रे यांनी खोपटे गावातील महिलांकरीता झी मराठी निर्मित "जाऊबाई गावात" या कार्यक्रमाच्या टिम कडून गंमतीशीर खेळांचे आयोजन करण्यात आले. या खेळामध्ये खोपटे गावातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन सहभाग घेतला. महिलांसाठी विविध प्रकारचे खेळ जसे की, कांदा फोडणे, लसूण सोलणे, तांदुळातुन खडे निवडणे, खोबरे किसणे, उस तोंडाने सोलणे इत्यादी मजेशीर खेळ झी टीव्ही निर्मित "जाऊबाई गावात" चे प्रतिनिधी रवि प्रधान व त्यांचे सहकारी प्रथम दाभोळकर यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात जमलेल्या महिलांकडून खेळ घेऊन उत्साहाने खेळांत रंगत आणली. महिलांसाठी त्यांच्या रोजनिशीतील कामांचे रूपांतर खेळात झाले आणि खेळ रंगतदार होत गेले. खेळात प्रथम आलेल्या महिलांना "जाऊबाई गावात" च्या टिम कडून पारितोषिकही देण्यात आले. उपस्थित महिलांकरीता भावना कैलास म्हात्रे यांच्या सौजन्याने लकी ड्रॉ काढून तीन महिलांना पैठणी साड्या बक्षीस देण्यात आल्या. या खेळाचे व्यवस्थापन मंगळागौरी व जास्वंदी स्वयंसहायता गटा तर्फे नियोजन करण्यात आले.

# सुवर्ण महोत्सवी श्री गुरु गोबिंदसिंघजी हॉकी स्पर्धा येत्या 10 जानेवारीपासून

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** श्री गुरु गोबिंदसिंघजी राष्ट्रीय गोल्ड अँड सिल्वर कप हॉकी स्पर्धेचे यंदाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. ही स्पर्धा येत्या 10 जानेवारी 2024 पासून येथील खालसा हायस्कुलच्या मिनी स्टेडियमच्या मैदानावर सुरु होणार आहे. नांदेडच्या क्रीडा रसिकांना हॉकीचा थरार अनुभवायला मिळणार असल्याने क्रीडापटूंसह क्रीडा प्रेमींमध्ये उत्साह संचारला आहे. 17 जानेवारी रोजी या स्पर्धेचा समारोप होणार आहे, अशी माहिती दुष्ट दमन क्रीडा युवक मंडळ नांदेडचे अध्यक्ष तसेच माजी नगरसेवक गुरमीतसिंघ नवाब यांनी गुरुवारी दिली आहे.

श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांच्या जन्मोत्सवास समर्पित राष्ट्रीयस्तरीय हॉकी स्पर्धा 1972 पासून नांदेड येथे नियमितपणे घेण्यात येते. या हॉकी स्पर्धेचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याने या स्पर्धेला विशेष असे महत्व प्राप्त झाले आहे. नांदेड सारख्या शहरात मागील 50 वर्षांपासून ही स्पर्धा सातत्य



टिकवून आहे हे एक इतिहास घडले आहे. या स्पर्धेत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तराचे खेळाडू कौशल्याचे प्रदर्शन करतात, असे सांगून गुरुमितसिंग नवाब पुढे म्हणाले की, या स्पर्धा आयोजनात शिरोमणी दुष्ट दमन क्रीडा युवक मंडळाची आयोजन समिती तीन महिन्यांपासून तयारी करत असते. समितीचे उपाध्यक्ष जितेंदरसिंघ खैरा, सचिव हरविंदरसिंघ कपूर, कोषाध्यक्ष हरप्रीतसिंघ लांगरी, सहसचिव संदीपसिंघ अखबारवाले, सदस्य महिन्दरसिंघ लांगरी, जसपालसिंघ काहलों, अमरदीपसिंघ महाजन, विजय नंदे, प्रा. जुझारसिंघ सिलेदार, सरदार खेमसिंघ यांचे मोलाचे योगदान असते. तसेच गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्ड संस्था, गुरुद्वारा श्री लंगर साहिब, गुरुद्वारा नानक झिरासाहेब बिदर, नांदेड महानगरपालिका, पोलीस प्रशासन, खालसा हायस्कुल, श्री हजुर साहिब आय.टी.आय. आणि शहरातील खेळाडू आणि सेवाभावी नागरिकांचेही सहकार्य मिळत असते. हॉकीचे सामन्यांचा आनंद घेण्यासाठी नांदेड शहरासह राज्यभरातून आलेल्या प्रेक्षकांचा नांदेडात सात दिवस मुक्काम असतो. नांदेडच्या क्रीडा वैभवात भर घालणाऱ्या या हॉकी सामन्यांचा आनंद घ्यावा, असे आवाहन सरदार गुरमीतसिंघ नवाब आणि सहकाऱ्यांनी केले आहे.

हॉकी इंडियाच्या नियमानुसार या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत एकूण सोळा संघ सहभागी होणार आहेत. त्यात ए.एस.सी. जालंधर, पंजाब पोलीस, एसजीपीसी अमृतसर, ईस्टर्न रेलवे कोलकाता, साईं एक्सेलेंसी सुन्दरगढ, सैफई इटावा, कस्टम मुंबई, एमपीटी मुंबई, रिपब्लिकन मुंबई, साईं एक्सेलेंसी औरंगाबाद, पुणे डिवीजन, दिल्ली यूनिवर्सिटी, आर्टलेरी नासिक, अमरावती, युथ खालसा नांदेड व नांदेड हॉकी संघ या संघाचा सहभाग राहील. स्पर्धेतील पहिला पारितोषिक रोख एक लाख रूपये आणि गोल्ड रोलिंग ट्रॉफी देण्यात येईल. द्वितीय पारितोषिक 51 हजार रूपये रोख आणि सिल्वर कप रोलिंग चषक आणि तिसरे पारितोषिक 11 हजार रूपये रोख आणि मोमेंटो प्रदान करण्यात येईल. शिवाय बेस्ट प्लेयर ऑफ द टूर्नामेंट, मैन ऑफ द मैच व इतर पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

# पहिले अखिल भारतीय 'एल्गार' गझल संमेलन २७ जानेवारीला

## अंमळनेरमध्ये गझलेचा एल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**अमळनेर :** पहिले अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन दि.२७ व २८ जानेवारी २०१४, शनिवार व रविवार रोजी अमळनेर येथे संपन्न होणार आहे. खान्देश साहित्य संघ आयोजित गझल संमेलन मातृहृदयी सानेगुरूजी साहित्य नगरीत छत्रपती नाट्यगृहात होणार असून दोन दिवशीय होणाऱ्या गझल संमेलनात देशभरातून शेकडो गझलकार सहभागी होतील. २७ जानेवारी रोजी सकाळी ९:३० वाजता संमेलनाचे उद्घाटन होईल व ११:०० वाजता गझल संमेलनातील प्रथम सत्रास सुरूवात होवून दिवसभरात 8 गझल सत्र होतील. प्रा. राहुलदेव कदम (लातूर) व संकेत नागपूरकर (नागपूर) यांच्या गझल मैफिल अर्थात गझल गायनाचा कार्यक्रम २७ जानेवारी रोजी रात्री ८ ते १० या वेळेत आयोजित केलेली आहे.... दुसऱ्या सत्रात गझल सादरीकरणाबरोबर गझलेचा प्रवास, लेखन व भविष्य या विषयावर परिसंवाद होईल. तर रात्री ८:०० ते १० गझलगायन मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. दुसऱ्या दिवशी २८ जानेवारी रोजी सकाळी ९:३० वाजता गझल सत्रास सुरूवात होवून ८ सत्रात गझल सादरीकरणासह एक परिसंवाद व सायंकाळी ६:०० वाजता समारोप कार्यक्रम होईल. सदर गझल संमेलनात गझल साहित्यकृतींचे प्रकाशन देखील करण्यात येणार आहे. खान्देश साहित्य संघाब्दारा आतापर्यंत अहिराणी व तिच्या उपभाषांच्या माध्यमातून असंख्य साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यात आले असून गझलसम्राट सुरेश भटांनी जी मराठी गझल रूजवली तिचा प्रवास बोलीभाषेतूनही प्रगल्भतेने फुलतो आहे यासाठी खान्देश साहित्य संघाने पहिले अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन घेवून खान्देशात साहित्यिक वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केलेला आहे. साने गुरूजी म्हणायचे. खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे.या विश्व बंधुतेच्या विचारांना पुढे नेण्यासाठी गझलकारांनी पुढाकार घेतलेला आहे. मराठी भाषेसह विविध बोलीभाषेत लेखन करणारे गझलकार सहभागासह लोकवर्गणीतून हे संमेलन घडवित आहेत, साहित्य चळवळीतील हा अनोखा उपक्रम सर्वाच्या कुतुहलाचा विषय झाला आहे. मागील चार संमेलनांमध्ये तीन दिवस चालणाऱ्या गझल कट्ट्याला तीन तासांचाच ठेवल्यामुळे पुरेशी संधी शिल्लक नाही. लोकांच्या काळजाला भिडणारा साहित्यातील काव्यप्रकार म्हणजेच गझल आहे. नव्या पिढीने सशक्तपणे गझलेचा सुरू केलेला प्रवास पाने, फुले किंवा प्रेयसी या विषयांच्या पलीकडे जाऊन सामाजिक भान जोपासत वेगवेगळ्या विषयांना हाताळणारा दर्जेदार व लोकपसंतीला उतरलेला साहित्य प्रकार आहे. म्हणून सर्व साहित्यिकांनी एकत्र येत भाषा समृध्दी व साहित्य प्रवाहाला पुढे घेवून जाण्यासाठी गझल संमेलन घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. मराठी भाषेत लेखन करणाऱ्या तमाम गझलकारांना संधी प्राप्त व्हावी या उद्देशाने संवादाच्या भूमिकेतून प्रतिपंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमळनेर शहरात पहिले अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन होत आहे. हे संमेलन गझलेच्या इतिहासातील नवे पाऊल ठरणार आहे. साहित्यिकांनी गझल नावाच्या साहित्य प्रकारासाठी उभारलेले नवे विचारपीठ देशभरातील गझल लेखकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. साहित्याला कोणतीच जात, धर्म, पंथ नसतो तर साहित्य हे सामान्य माणसाच्या जगण्याचे प्रश्न मांडत असते. त्याचाच एक भाग म्हणून समाजाचा आरसा बनलेली गझल माय, माती, राष्ट्र, प्रेम, शेती अशा विविध विषयांना किती प्रभावीपणे मांडते व समाजप्रबोधनाची काळजी वाहते हे या संमेलनातून बघावयास मिळणार आहे. साहित्य चळवळीला समृध्द करण्यासाठी सुसंवादी भूमिकेतून खान्देश साहित्य संघ व तमाम गझल साहित्य प्रेमींनी दि. २७ व २८ जानेवारी २०२४ हा दिवस संमेलनासाठी निश्चित केलेला आहे. खान्देश साहित्य संघ आयोजित पहिले अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाच्या डॉ.विशाल इंगोले,लोणार यांनी तयार केलेल्या बोधचिन्हाचे अनावरण करून संमेलनाविषयी माहिती देण्यात आली. याप्रसंगी प्रा. डॉ. सदाशिव सुर्यवंशी, शरद धनगर, डॉ. कुणाल पवार, रामकृष्ण बाविस्कर, सुनिता पाटील,रत्नाकर पाटील,दत्ता सोनवणे, शरद पाटील,अशोक इसे,छाया इसे, संजय रतन साळुंखे, उमेश कारे विविध गझलकार साहित्यिक उपस्थित होते.



अखिल भारतीय एल्गार मराठी गझल सम्मेलन येत्या 27,28 जानेवारी 2023 रोजी अंमळनेर येथे संपन्न होत आहे . ह्या संमेलनासाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील मराठी गझलकारांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे . मराठी गझलकार सर्व गट – तट सोडून एकत्र आले आहेत आणि सर्वजण मिळून गझल सम्मेलन यशस्वी करण्यासाठी झटत आहेत .संमेलन यशस्वी करण्यासाठी स्थानिक समिती अहोरात्र काम करत आहे .मराठी गझल प्रचंड लोकप्रिय होत आहे .मराठी गझलेला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे . मराठी गझलेला उचित सन्मान, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हे संमेलन घेण्यात येत आहे .छत्रपती संभाजी नगरहूनही अनेक गझलकार ह्या संमेलनात सहभागी होणार आहेत . . **गिरीश जोशी, गझ गिरीश**



**साहित्य महामंडळाची गझलेविषयीची अनास्था आणि गझल विधे विषयीची अनाकलनीय भूमिका लक्षात आल्यावर देशातील सर्वच मराठी गझलप्रेमिनी एकत्र येऊन गझलेच्या प्रसार आणि प्रचारासाठी यावर्षीपासून अखिल भारतीय एल्गार गझल संमेलन घेण्याचे निश्चित केले आहे . मराठी गझल आणि मराठी साहित्यसंस्कृतीसाठी हे अत्यंत महत्वाचे पाऊल आहे असे मला वाटते . – रमेश ठोंबरे, छत्रपती संभाजीनगर**

# डेल्टा फिनोकेम प्रा. लि. या कंपनीतील कामगारांचे विविध मागण्यांसाठी २७ दिवसांपासून बेमुदत उपोषण सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील वाडीव-हे येथील डेल्टा फिनोकेम प्रा. लि. या कंपनीतील १५ कामगारांना टप्या टप्याने कायम करण्याचे ठरले असतांना देखिल अद्याप या कामगरांना कायम करण्यात आले नाही. ते त्वरीत कायम करा. कामगार गणेश पवार, चिराग शेळके, शिवाजी आव्हाड या कामगारांनी युनियन केली याचा राग मनात धरून कंपनी व्यवस्थापनाने खोटे कारणं देवून कामावरून कमी केले आहे. त्या कामगारांना त्वरीत पुर्ववत कामावर रूजु करून घेणे. दिपक गायकर हे कामगार प्रतिनिधी आहेत व त्यांना व त्यांचे इतर कामगार प्रतिनिधी यांना ६ नोव्हेंबर रोजी संदिप देशमुख साहेब यांनी कामगारांच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यास बोलवून घेतले व कामगार प्रतिनिधी यांना शिवीगाळ केली. तसेच दिपक गायकर यांच्या घरच्या पत्त्यावर निलंबन पत्र पाठविले आहे. ते त्वरीत मागे घेवून पुर्ववत कामावर रूजु करून घ्यावे. जानेवारी व जुलै २०२१ चा महागाई भत्ता ठरल्याप्रमाणे अद्याप कामगारांना लागू केले नाही. तो त्वरीत लागु करावा. कंपनीतील व्यवस्थापनातील मॅनेजर श्री. सुबोध पगार, गोरक्षनाथ कदम, चंद्रशेखर कवडे हे कामगारांच्या विरोधात चुकीची माहीती कंपनी मालक यांना देत असतात. त्यांचेवर कारवाई करावी. अशा आदी मागण्यांसाठी कामगारांनी नाशिक वर्कस युनियनच्या नेतृत्वाखाली संप पुकारला आहे. या आंदोलनावेळी सिटूचे उपाध्यक्ष सिताराम ठोंबरे, देविदास आडोळे, तुकाराम सोनजे, चिटणीस संतोष काकडे, दत्ता राक्षे, गौतम कोंगळे, रोहीदास टिळे, भाऊसाहेब जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते. या बेमुदत संपाला इन्फुलुम कंपनीचे कामगार, सॅमसोनाईट कंपनीचे कामगार , गोवर झंपा कंपनीचे कामगार , अरोहेड सेप्रेशन कंपनीचे कामगार, डेल्टा कंपनीचे कामगार व त्यांचा परिवार या बेमुदत संपात सहभागी झाले आहेत.




# जन्मदात्यांनीच मुलीली ढकलले देहव्यापारात

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** राज्यात महिला अत्याचाराच्या आणि गुन्ह्यांच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असताना आता भंडारा जिल्ह्यात मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. जन्मदात्या आई वडिलांनीच पैशांसाठी असं काही केलं की वाचून तुमच्या पायाखालची जमीन सरकेल. बारावीत शिक्षण घेणाऱ्या १७ वर्षीय पोटच्या पोरीला जन्मदात्या आई-वडिलांनीच पैशांसाठी विकून विविध व्यक्तींकडून सामूहिक अत्याचार करायला भाग पाडले. ही धक्कादायक घटना भंडारा जिल्ह्याच्या साकोली पोलीस स्टेशन अंतर्गत घडली. पीडितेच्या काकूने पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर हा घृणास्पद आणि खळबळजनक प्रकार समोर आला आहे.

साकोली तालुक्यातील वडद गावात हा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. पीडिता साकोली येथील एका महाविद्यालयात बारावीत शिक्षण घेत आहे. गावावरून रोज ये-जा करण्यासाठी त्रास होत असल्याने ती साकोली येथील काकाकडे राहून शिक्षण घेत होती. कालांतराने पीडितेच्या वडिलांनी तिला गावाला बोलावून घेतले. बऱ्याच दिवसांपासून पीडितेसोबत बोलणे झाले नसल्याने काकाने १४ डिसेंबर रोजी फोन करून तिच्या प्रकृतीची आणि कुटुंबियांची विचारपूस केली. त्यावेळी पीडीतेने आपल्यासोबत घडलेला संपूर्ण प्रकार काकु जवळ कथन केला. पीडितेच्या काकूने पुढाकार घेत साकोली पोलिस ठाण्यात याची तक्रार नोंदवली. पैशांसाठी पोटच्या मुलीला आई आणि वडिलांनीच ओळखीतील काही इसमांसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी बळजबरी केल्याचे पीडित मुलीकडून सांगण्यात आले आहे.

